संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा
रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रुपये अहिल्यानगर, शनिवार दि. १७.१०.२०२६ अंक नं. १६९ वर्ष ६९ वे दैनिक वर्ष ६३ वे ANR/022/2018-2020

DHANA'S PAITHANI
दिवाळी स्पेशल
प्रदर्शन व विक्री
वीण सोनेरी नात्यांची
१८ ऑक्टोबर
रविवार | स. १०.३० ते रा. ८.३०
एलीट बँक्वेटस
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वस्तिक चौक,
अहिल्यानगर

आकर्षक डिस्काउंट्स!
7499906122 www.dhanaspaithani.com

ना नफा ना तोटा पहिली तीन वर्ष.. कृपया त्याचा फायदा घ्या
कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रूट दुकानदारांना संपर्क करा
10 किलो मागे 1 मोठी पिशवी फ्री..फ्री..
रत्नकमल चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व
रत्नकमल चहा
एक वेळेस जरूर तुलना करून पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

THAILAND
INTERNATIONAL SHOPPING CARNIVAL
FURNITURE & LIFESTYLE EXPO
THAILAND IRAN DUBAI MALAYSIA AFGANISTAN TURKEY SINGAPORE
DATE : 16 TO 25 OCT. 2026
TIMING : 2PM TO 10PM
EXHIBITION GROUND, OPP. VRINDAVAN LAWN,
SAVEDI, BESIDE HOTEL ANUSHKA, NAGAR MANMAD ROAD, AHILYANAGAR
FOR YOUR STALL BOOKING : 9923555733, 9215556345

नगर रोलिंग शटर
*जुने शटर रिपेरिंग
*गेअर शटर रिपेरिंग
*नवीन शटर मिळेल
(रमेश ढवळे) 7350682390
पत्ता - नगर-अमरधाम, नालेगाव, लोंढे मळा अहिल्यानगर

Since 1976, 50 Years of Trust
विश्वासाची परंपरा
स्थापना १९७६ ची
५० वर्षे विश्वासाची..
5% फ्लॅट सूट सर्व खरेदीवर 5% Flat Discount
५० वर्षपूर्तीनिमित्त सर्व खरेदीवर ५% फ्लॅट सूट
50 सुवर्ण महोत्सवी वर्ष GOLDEN JUBILEE
50 वर्षाच्या विश्वासाबद्दल सर्व ग्राहकांचे मनापासून आभार!
: आपले नम्र :
सुजाता एंटरप्रायझेस परिवार,
३४२१, खिस्तगल्ली, अहिल्यानगर-४१४००१, मो : 9422220681
सुजाता एंटरप्रायझेस
टेलरिंग मटेरियल, अस्तर व फॉलचे होलसेल व रिटेल विक्रेते
Sujata ENTERPRISES
* दर्जेदार अस्तर * फॉल * टेलरिंग मटेरियल * होलसेल आणि रिटेल उपलब्ध

CAMEL SAGO
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

सागवान उंबरा
आपल्या घराचे मुख्य प्रवेशद्वारा साठी लक्ष्मीजी पाऊले असलेले नक्षी कामाचे उंबरा सागवानी लाकूड मध्ये बनवून मिळेल.
संपर्क : परेश पित्रोडा - 9823704000

लक्ष्मी ग्लासीज 9890963100
लोकेश मार्केटिंग 9766045549

एव्हरग्रीन ड्रायफ्रुटस आणि मसाले घेऊन आले आहेत.
प्रत्येकी २५० ग्रॅम — ''दसऱ्यानिमित्त खास ऑफर'' — प्रिमियम क्वॉलिटी आणि होलसेल दर! — प्रत्येकी ५०० ग्रॅम

| वस्तू | ऑफर रेट | वस्तू | ऑफर रेट |
|---|---|---|---|
| काजू | २३०/- | बुमन काळी खजूर | ९०/- |
| बोल्ड काजू | २७०/- | किमया खजूर | १८०/- |
| इंडिपेंडंट बदाम | २७०/- | डेटक्राऊन खजूर | २००/- |
| कॅलिफोर्निया बदाम | ३१०/- | प्रिमियम लुज खजूर | २५०/- |
| जम्बो कॅलिफोर्निया बदाम | ३४०/- | प्रिमियम सफावी खजूर | ३८०/- |
| जम्बो पिस्ता | ४८०/- | साधा खाकरा | १३०/- |
| अंजीर | २८०/- | जिरा खाकरा | १३०/- |
| अक्रोड मगज | २९०/- | मेथी खाकरा | १३०/- |
| चिली अक्रोड मगज | ४१०/- | पावभाजी खाकरा | १३०/- |
| किशमिश | ११०/- | पाणीपुरी खाकरा | १३०/- |
| काळे मनुके | १४० /- | मध (शुगर फ्री) | १५० /- |
| जरदाळू | १४० रु. | केमिकल विरहित गुळ १ कि. | ६५/- |
| मिक्स सिडस् | १५०/- | | |

गाईचे तुप (१लि.)-६६०/- गाईचे तुप (५०० ml)-३४०/-/-
आवळा (१ कि.) २८०/- खारीक (१ कि.) २४०/-
*नातेवाईक, मित्र परिवार किंवा कर्मचाऱ्यांना देण्यासाठी आकर्षक गिफ्ट बॉक्स उपलब्ध.
*सर्व प्रकारच्या सिडस, ड्राईड फ्रुट कॅडी, फ्लेवर मखाना, बडीशेप, चिप्स, चिक्की होलसेल दरात मिळतील.
ऑफर कालावधी- शनिवार दि. १७/१०/२०२६ ते मंगलवार दि. २०/१०/२०२६
एव्हरग्रीन ड्रायफ्रुटस आणि मसाले
आसरा ट्रेडर्ससमोर, महाजन गल्ली, अहिल्यानगर. Mo- 7387624996

खुलविण्या स्त्री सौंदर्याचं तन-मन..
आम्हीही करतोय
सिमोल्लंघन

जिल्ह्यातील पहिलेच भव्य प्रशस्त,
पुण्या-मुंबईच्या धर्तीचे वातानुकुलित
कॉस्मेटिक्स दालन...

लवकरच 'सारडा लेन' येथे शुभारंभ...
आमच्या सर्व माता-भगिनींना व हितचिंतकांना विजयादशमीच्या शुभेच्छा !
महावीर
कॉस्मेटिक्स
मोची गल्ली, अहिल्यानगर.
Dishan

HAPPY Dussehra
Conquer in style. Lead with warmth

THE Raymond SHOP
Custom Tailoring | Ready to Wear | Accessories
अहिल्यानगर शॉप नं. २५८८, लोकसेवा हॉटेल जवळ, एम. जी. रोड, कापडबाजार. ०२४१-२९९९६६० शॉप नं. १ ते ३, ग्राऊंड फ्लोअर, माऊली संकुल, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी. ०२४१-२३५३०९२
GALAXY

## १३ वे पुण्यस्मरण



स्व. सचिन अर्जुनराव दाणे
स्व.१८.१०.२०१३

आपल्या संस्काररूपी स्मृतींचा..स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच आम्हांला प्रेरणा देत आहे..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली

दादा ट्रान्सपोर्ट मित्र मंडळ
अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## माहितीचा वाढता ओघ आणि निर्णयांबद्दलची साशंकता


राजन कुटे

एकेकाळी माहितीचा अभाव हा संपत्ती निर्माण करण्याच्या मार्गातील एक अडथळा होता. आज माहितीची कमतरता नाही; उलट, माहितीचा ओघ इतका वाढला आहे की त्यातून नेमकं काय घ्यावं, याबद्दलच गोंधळ निर्माण होऊ लागला आहे. माहिती मिळवणं सोपं झालं, पण घेतलेल्या निर्णयावर विश्वास ठेवणं तितकंच सोपं राहिलेलं नाही.

गुंतवणुकीच्या बाबतीत हे विशेषतः जाणवतं. एखादी गुंतवणूक करताना आपण उपलब्ध माहिती पाहतो, आपल्या गरजा आणि उद्दिष्टांचा विचार करतो आणि निर्णय घेतो. पण त्यानंतर माहिती मिळवणं थांबत नाही. कुठे एखाद्या गुंतवणुकीने चांगला परतावा दिल्याची चर्चा असते, तर कुठे बाजारात घसरण होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. एखादा तज्ज्ञ एका दिशेने विचार करायला सांगतो, तर दुसरा त्याच्या अगदी विरुद्ध मत मांडतो.

हे सगळं वाचताना किंवा ऐकताना प्रत्येक गोष्ट महत्त्वाची वाटू लागते. दुसरा पर्याय अधिक चांगला होता का, आपण काही महत्त्वाची गोष्ट दुर्लक्षित केली का, असे विचार मनात येतात. आधी घेतलेल्या निर्णयाबद्दल शंका निर्माण होते आणि पुन्हा नव्याने माहिती शोधण्यास सुरुवात होते. अधिक माहिती मिळाल्यावर मन शांत होईल, असं वाटतं; पण अनेकदा त्यातून आणखी प्रश्न निर्माण होतात.

याचा परिणाम निर्णय घेण्यापुरता मर्यादित राहत नाही. एखादी गुंतवणूक काही काळ चांगला परतावा देते. त्यानंतर दुसऱ्या गुंतवणुकीच्या कामगिरीची चर्चा ऐकू येते. आपली निवड मागे पडली आहे का, असा विचार मनात येतो. बाजारात घसरण झाली की आधीचा निर्णय चुकीचा होता का, अशी शंका पुन्हा डोकं वर काढते. प्रत्येक नव्या घडामोडीबरोबर निर्णयाचा फेरविचार होत राहिला, तर दीर्घकाळासाठी केलेल्या नियोजनात स्थिरता राखणं कठीण होऊन बसतं.

इथे भगवद्गीतेतील अर्जुनाची आठवण होते. युद्धभूमीवर उभा असताना त्याच्या मनात निर्माण झालेला संघर्ष केवळ परिस्थितीचा नव्हता; त्या परिस्थितीकडे पाहताना मनात उठलेल्या विचारांचाही होता. आपल्यासमोर काय आहे, यापेक्षा त्याचा अर्थ आपण कसा लावतो, यावरही आपल्या निर्णयांची दिशा ठरू शकते. गुंतवणुकीतही नवी माहिती समोर येते तेव्हा प्रश्न केवळ त्या माहितीचा नसतो; तिच्यामुळे आपण आपल्या आधीच्या निर्णयाकडे कोणत्या नजरेने पाहू लागतो, हाही असतो.

याचा अर्थ नवी माहिती दुर्लक्षित करावी किंवा एकदा घेतलेला निर्णय बदलूच नये, असा नाही. परिस्थिती बदलली असेल, गुंतवणुकीमागची कारणं बदलली असतील किंवा आपल्या गरजांमध्ये फरक पडला असेल, तर निर्णयाचा फेरविचार करणं स्वाभाविक आहे. पण केवळ एखादी नवी बातमी समोर आली, दुसऱ्या गुंतवणुकीची चर्चा झाली किंवा बाजारात काही काळ घसरण झाली, म्हणून आपला निर्णय चुकीचा ठरला आहे, असं मानण्याचं कारण नाही.

अशा वेळी स्वतःला एक साधा प्रश्न विचारता येईल: नव्या माहितीतून माझ्या निर्णयाशी संबंधित काही मूलभूत बदल समोर आला आहे, की केवळ माझ्या मनात नवी शंका निर्माण झाली आहे? या प्रश्नाचं उत्तर लगेच मिळेलच असं नाही; पण त्यामुळे प्रत्येक बातमीच्या मागे धावण्याऐवजी तिचा आपल्या निर्णयाशी काय संबंध आहे, हे पाहता येईल.

आज माहिती मिळवणं कठीण राहिलेलं नाही. मात्र, प्रत्येक माहितीला सारखंच महत्त्व न देता, आपल्या उद्दिष्टांशी संबंधित गोष्टी ओळखणं अधिक महत्त्वाचं झालं आहे. कारण अधिक माहिती असणं आणि त्या माहितीचा योग्य उपयोग करणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

प्रत्येक नवी माहिती आपल्याला नवा निर्णय घ्यायला सांगत नाही. कधी कधी ती आपल्या आधीच्या निर्णयाकडे पुन्हा शांतपणे पाहण्याची संधी असते.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०


## आवाहन भूदात्यांना, आधार दिव्यांगांना !



प्रिय आत्मीय,

अनामप्रेम ही स्नेहालय परिवारातील संस्था मागील 21 वर्षांपासून दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत आहे. अहिल्यानगर महापालिका हद्दीत कल्याण रस्त्यावर अनामप्रेम संस्थेने 9000 चौरस फुटांच्या भूखंडाचे साठेखत केले आहे.

येथे दिव्यांगांसाठी अखिल भारतीय स्तरावरील बहुउद्देशीय सेवा – पुनर्वसन प्रकल्प उभा केला जाणार आहे. यामध्ये दिव्यांग बालकांचे वसतिगृह , भोजनगृह,**स्पर्धा परीक्षा केंद्र**, संगणक – अन्य रोजगार कौशल्य आणि ब्रेल लिपी.. मोफत फिजिओथेरपी आणि आरोग्य केंद्र इत्यादी प्रकल्पांची उभारणी वर्ष 2028 अखेर पूर्ण केली जाईल.**जागेच्या खरेदीसाठी 1 कोटी 40 लक्ष रुपयांचा अर्थ सहयोग देणाऱ्या दात्याचे नाव या प्रकल्प परिसराला संस्था देणार आहे.** आपल्या दिवंगत कुटुंबीयांच्या स्मरणार्थ जागा खरेदीसाठी आर्थिक सहयोग देण्याची विनंती स्नेहालय – अनामप्रेम परिवाराने सहृदय दात्यांना केली आहे. **संपर्क** : pratisaad@snehalaya.org. 7770027505


## शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत

नगर – शहरातील विविध भागातील पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने ऐन सणासुदीच्या दिवसात नागरिकांचे हाल होत आहेत. याबाबत त्या त्या भागातील नागरिक संबंधीत नगरसेवकांकडे तक्रारी करत असून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करत आहेत. किमान दसरा–दिवाळीसारख्या महत्वाच्या सणांच्या काळात तरी मुबलक व सुरळीत पाणीपुरवठा व्हावा, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिक करत आहेत. यावर्षी पावसाचे प्रमाण कमी असले तरी नगर शहराला ज्या मुळा धरणातून पाणीपुरवठा होतो त्या धरणात मुबलक पाणीसाठा असतानाही नगरकरांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

नालेगाव, अमरधाम परिसर, तांगेगल्ली, झारेकर गल्ली, होशींग हॉस्पीटल परिसर, शनी गल्ली, जुने कोर्ट गल्ली, आंनदी बाजार, घुमरे गल्ली, नवी पेठ, आडते बाजार, घास गल्ली, कापड बाजार, डाळ मंडई, तेलीखुंट परिसर आदी मध्यवर्ती व शहरातील महत्वाच्या भागांत घरांना व्यवस्थित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे सदर परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी गैरसोय होत असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वारंवार भटकंती करावी लागत आहे.

सदरचा भाग हा शहराच्या मध्यवर्ती असून या भागात अनेक व्यापारी दुकाने आहेत. सदर भागातील नागरिकांनी मला सक्षम भेटून विस्कळीत झालेल्या पाणीपुरवठा बाबत तक्रारी केलेल्या असून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे. सध्या सणासुदीचे दिवस असून नागरिकांस पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज असते, परंतु अपुऱ्या पाणी पुरवठ्याअभावी नागरिकांची गैरसोय होत आहे. तरी सदर प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देवून पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करावा, अशी मागणी महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांनी आयुक्तांकडे निवेदनाव्दारे केली आहे.

## मुळा धरणावरील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करावा

**महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव यांच्या महावितरण प्रशासनाला सूचना, पाच ते सहा दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने केडगावकर त्रस्त; महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक**


मुळा धरणावरील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. (छायाचित्र – लहु दळवी)

नगर – मुळा धरण येथून सुमारे ३० किलोमीटर अंतरावरून अहिल्यानगर शहराला पाणीपुरवठा केला जातो. मात्र, गेल्या महिनाभरापासून मुळा धरण परिसरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. परिणामी, नागरिकांना पाण्यासाठी विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून, नागरिकांचा रोष महानगरपालिका प्रशासन आणि नगरसेवकांना सहन करावा लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव आणि आयुक्त यशवंत डांगे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत खंडित होणारा वीजपुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी केली.

नागरिकांकडून नगरसेवक आणि महापालिका प्रशासनाविषयी नाराजी व्यक्त केली जात आहे. महापालिकेने वीजपुरवठ्याच्या समस्येबाबत महावितरण कार्यालयाशी वारंवार पत्रव्यवहार करूनही वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार सुरूच असल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. वीजपुरवठा आणि पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर वारंवार बैठका होऊनही अद्याप कायमस्वरूपी तोडगा निघालेला नाही. त्यामुळे हा प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास नगरसेवक कार्यालयावर मोठा मोर्चा काढण्यात येईल, तसेच यापुढे तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही नगरसेवक अविनाश घुले व प्रकाश भागानगरे यांनी दिला.

भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी महावितरण प्रशासनाने मुळा धरण येथे सबस्टेशन उभारण्यासाठी तसेच १३२ केव्ही वीजवाहिनीवरून जोडणी घेण्यासाठी नवीन प्रस्ताव तयार करून राज्य शासनाकडे पाठवावा, अशी मागणी केली. हा प्रस्ताव मार्गी लागण्यासाठी आपण पाठपुरावा करू, असेही त्यांनी सांगितले.

या बैठकीला महापौर गाडे, उपमहापौर जाधव यांच्यासह मनपा महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, उपायुक्त मेहर लहारे, महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, अविनाश घुले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, पुष्कर कुलकर्णी, पाणीपुरवठा अधिकारी गणेश गाडळकर, महादेव काकडे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

### भूमिगत वीजवाहिन्या किंवा १३२ केव्ही वाहिनीद्वारे जोडणीचा पर्याय

महावितरण कार्यालयाचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी सांगितले की, मुळा धरण परिसरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी भूमिगत वीजवाहिन्या टाकून वीजपुरवठा करावा लागेल किंवा राहुरी परिसरातून १३२ केव्ही वीजवाहिनीवरून जोडणी घ्यावी लागेल. यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे. वीजपुरवठा खंडित होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

### केडगावचा पाणीपुरवठा दोन ते तीन दिवसांनी करण्याची मागणी

नगरसेवक तथा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी केडगाव परिसरातील पाणीपुरवठ्याच्या समस्येकडे लक्ष वेधले. केडगावला पाच ते सहा दिवसांनी पाणी मिळत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. केडगाव परिसराकडे नेहमीच दुर्लक्ष केले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे या भागाचा पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करून दोन ते तीन दिवसांनी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

### चौदा दिवसांत आठ वेळा वीजपुरवठा खंडित

मिळालेल्या माहितीनुसार, महिनाभरापासून मुळा धरण परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. एक ते १४ तारखेच्या कालावधीत सुमारे आठ वेळा वीजपुरवठा खंडित झाला. वीजपुरवठा पुन्हा सुरू झाल्यानंतरही पाणीपुरवठा पूर्ववत होण्यासाठी सुमारे तीन तासांचा कालावधी लागतो. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडून शहरातील विविध भागांना पाणी मिळण्यास विलंब होत आहे. विशेषतः केडगावसारख्या मोठ्या उपनगरात पाच ते सहा दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.


राशीन येथे चोरी करणाऱ्या मुख्य आरोपीसमवेत पोलिसांचे पथक.

## हत्याराचा धाक दाखवून चोरी करणारा आरोपी जेरबंद

नगर – कर्जत तालुक्यातील राशीन येथे हत्याराचा धाक दाखवून चोरी करणारा मुख्य आरोपीस अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. राजुऱ्या उर्फ राजु सुलाख्या चव्हाण, रा. कोरेवस्ती भांबोरा, ता.कर्जत असे आरोपीचे नाव असून त्याच्या इतर तीन साथीदारांचा पोलीस शोध घेत आहेत. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता तीन दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

याबाबतची हकीकत अशी की, राशीन येथील राऊत वस्तीवर चंद्रकला विलास राऊत यांच्या घरात आरोपी व त्याच्या साथीदाराने सुमारे दोन लाखांचे दागिने व मोबाईल चोरून नेले होते. याबाबत गुन्हा दाखल झाल्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी सुजितकुमार क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखालील पोलीस पथकाने सदर आरोपीस सापळा रचून ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने आपल्या तीन साथीदारांसह कोयत्याच्या धाकाने हा गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यास ताब्यात घेत त्याच्याकडील मुद्देमाल जप्त केला असून त्यास न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली. तसेच कोयत्याच्या धाकाने धमकाविल्याप्रकरणी आणखी गुन्ह्याचे कलम वाढविण्यात आले आहे. पोलीस आरोपीच्या इतर तीन साथीदारांचा शोध घेत आहेत.

उपविभागीय पोलिस अधिकारी क्षिरसागर यांच्यासह कर्जतचे पोलिस निरीक्षक हनुमंत गायकवाड, सपोनि गणेश जाधव आदींच्या पथकाने ही कारवाई केली.


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME **YASMIN AYAZ KAZI** CHANGED AS NEW NAME **YASMEEN AYAZ KAZI** As Per Aadhar No- 440314015957

**CHANGE IN NAME**
MY OLD NAME WAS **Pooja Hiralal Sadwani** MY NEW NAME **Rekha Hiralal Sadwani** BOTH NAME'S ARE ONE PERSON AADHAR NO- 902239050032

खास नवरात्री निमित्ताने तळीच्या
साड्यांचा भव्य सेल...तो ही फ्रेश स्टॉक वर.....
नगरमधे खूप साड्यांची दुकाने पाहिली असतील
एकदा महावीर मॉलला भेट देऊन बघा...
स्वस्त म्हणजे नेमक काय असतं....



₹ 999/- मध्ये 4 साडया
सियाराम पॅन्टपीस शर्टपीस जोडी फक्त ₹ 499/- मध्ये
लिलन शर्ट 25 कलरध्ये ₹ 499/- M to xxl
रेमंड शुटिंग ₹ 299/- मीटरमध्ये
सर्व प्रकारचे फॅन्सी रेडिमेड वर 20 ते 50 % डिस्काउंट
सर्व वस्तूंची अशी रेंज जी रेग्युलर मार्केटला पहायला मिळणार नाही.
आणि तेही होलसेल रेटमध्ये...
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001



सहावे पुण्यस्मरण



स्व. विजय यशवंत कंगे
स्व.दि. १७/१०/२०२०
आठवण तुमची प्रत्येक क्षणाला, व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात, सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
* शोकाकुल *
श्रीमती स्नेहलता विजय कंगे
डॉ.विवेकानंद यशवंत कंगे  राजेंद्र यशवंत कंगे
सौ.स्मिता आशिष धामणेकर  आशिष निळकंठराव धामणेकर
प्रमोद विजय कंगे  सौ.शर्मिला प्रमोद कंगे
यश, आरोही
समस्त कंगे परिवार.


## बबन वरकड यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – हातोळण (ता. आष्टी) येथील बबन सोनाजी वरकड (वय ६५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. तुळजाभवानी मातेचे ते निस्सिम भक्त होते. आराधी मेळ्यातील लोककलावंत म्हणून सर्वत्र परिचित होते.

त्यांच्या मागे पत्नी, तीन भाऊ, भावजय व पुतणे असा परिवार आहे. उद्योजक सचिन वरकड, शशिकांत वरकड, अमोल वरकड आणि पत्रकार डॉ. सूर्यकांत वरकड यांचे ते चुलते होत.

## बबईबाई पडोळे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी बबईबाई रामभाऊ पडोळे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने व अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १७ ऑक्टोबर रोजी चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अंबादास, अशोक, सुरेश पडोळे यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## केस मागे घेण्याच्या कारणावरून एस.टी. कर्मचाऱ्याला मारहाण

नगर – अहिल्यानगर न्यायालयाच्या परिसरात सुरू असलेली कायदेशीर केस मागे घेण्याच्या कारणावरून एका एस.टी. महामंडळ कर्मचाऱ्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून धारदार चाकूने वार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोघांसह इतरांवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

योगेश राम सटाले (वय ३०, रा. सारसनगर, अहिल्यानगर) असे फिर्यादी असलेल्या एस.टी. महामंडळ कर्मचाऱ्याचे नाव आहे. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास अहिल्यानगर न्यायालय परिसरात ही घटना घडली. श्रीराम अण्णासाहेब भेंडेकर आणि सरला वाणी यांच्यासह इतर दोन जणांवर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी हे न्यायालय परिसरात असताना आरोपींनी त्यांना न्यायालयातील चालू असलेली केस मागे घेण्यास सांगितले. फिर्यादीने केस मागे घेण्यास नकार दिल्यामुळे आरोपींनी त्यांना अश्लील शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच आरोपींपैकी एकाने हातातील धारदार चाकूने वार करून फिर्यादीला जखमी केले. घटनेनंतर जखमी फिर्यादीला उपचारासाठी अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातून प्राप्त झालेल्या जबाबावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सपोनि तेजश्री थोरात करीत आहेत.


मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्यासह त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि मतदारांच्या हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा आरोप करत विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया (एसआयआर) रद्द करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या वतीने अहिल्यानगर शहरात साखळी उपोषण सुरू आहे. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सुरू असलेल्या या आंदोलनाचा शनिवारी नववा दिवस होता. दरम्यान, रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र गवई यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपोषणात सहभाग नोंदवला.

# गृहिणी

## आरोग्य

### निसर्गाच्या सानिध्यात आणि कोवळ्या उन्हात शरीरभार व्यायामाचे महत्त्व

मानवी शरीर हे निसर्गाचाच एक अविभाज्य भाग आहे आणि म्हणूनच निसर्गाच्या सानिध्यात राहणे आरोग्यासाठी नेहमीच लाभदायक ठरते. आजच्या धकाधकीच्या जीवनात बंदिस्त खोल्यांमध्ये व्यायाम करण्यापेक्षा मोकळ्या हवेत, हिरव्यागार परिसरामध्ये आणि सूर्योदयाच्या कोवळ्या उन्हामध्ये स्वतःच्या शरीराच्या वजनाचा वापर करून केला जाणारा व्यायाम शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी अमृततुल्य मानला जातो. जेव्हा आपण हिरवळीवर पाऊल ठेवून व्यायाम करतो, तेव्हा निसर्गातील शुद्ध प्राणवायू आपल्या फुफ्फुसांमध्ये भरून राहतो, ज्यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि शरीरातील प्रत्येक पेशीला नवीन ऊर्जा मिळते. सकाळच्या कोवळ्या उन्हात व्यायाम केल्याने शरीराला निसर्गाकडून आवश्यक ती उष्णता आणि पोषक घटक मिळतात, ज्यामुळे हाडे बळकट होतात आणि शरीराची प्रतिकारशक्ती प्रचंड प्रमाणात वाढते. कोणत्याही कृत्रिम उपकरणांचा वापर न करता केवळ स्वतःच्या शरीराच्या वजनावर आधारित व्यायाम केल्याने स्नायू बळकट होतात, शरीराची लवचिकता वाढते आणि पाठीचा तसेच सांध्यांचा कणा मजबूत होतो. हा व्यायाम शरीराला योग्य आकार देण्यासोबतच शरीराचा समतोल राखण्यास अत्यंत उपयुक्त ठरतो. हिरव्यागार गवतावर व्यायाम करताना मनाला एक असीम शांतता लाभते. यामुळे मानसिक ताणतणाव आणि चिंता दूर होऊन मन प्रसन्न व उत्साही बनते. निसर्गातील शांत वातावरण आणि व्यायामाची ही नैसर्गिक पद्धत माणसाला शारीरिकदृष्ट्या बलवान आणि मानसिकदृष्ट्या शांत बनवते. म्हणूनच, आरोग्याची उत्तम जोपासना करण्यासाठी निसर्गाच्या कुशीत, कोवळ्या उन्हात शरीराच्या वजनावर आधारित व्यायाम करणे अत्यंत गरजेचे आहे आणि याचे दीर्घकालीन फायदे संपूर्ण आयुष्याला निरोगी बनवतात.

## पाककला

### गुलकंद पान बासुंदी

**साहित्य :** फुल क्रिम दूध: १ लिटर, खाण्याच्या पानांची पाने (कलकत्ता पाने) ४ ते ५ (स्वच्छ धुऊन बारीक चिरलेली), साखर १/४ कप (किंवा आवडीनुसार), गुलकंद २ मोठे चमचे, बडीशेप पावडर १ छोटा चमचा, हिरवी वेलची पावडर १/२ छोटा चमच, सुकामेवा (बदाम व पिस्त्याचे काप, चारोळी), २ मोठे चमचे खाद्य हिरवा रंग २ ते ३ थेंब (ऐच्छिक)

**कृती :** एका जाड बुडाच्या कढईत फुल क्रिम दूध उकळायला ठेवा. दूध चांगले उकळल्यावर आच मध्यम करून दूध आटवून घ्या (दूध आटून निम्मे होईपर्यंत सतत ढवळत राहा, जेणेकरून ते तळाला लागणार नाही). दूध चांगले घट्ट झाल्यावर त्यात साखर घाला आणि साखर विरघळेपर्यंत ५ मिनिटे पुन्हा उकळून घ्या. एका मिक्सरच्या भांड्यात खाण्याची पाने (पान), थोडेसे दूध किंवा गुलकंद घालून बारीक वाटून त्याची मऊ पेस्ट तयार करा. आता आटवलेल्या घट्ट दुधामध्ये तयार केलेली पानाची पेस्ट, गुलकंद आणि बडीशेप पावडर घाला. सर्वकाही चांगले मिक्स करा. (हवे असल्यास सुंदर रंगासाठी अगदी २ थेंब हिरवा अन्न रंग घालू शकता) हे सर्व मिश्रण मंद आचेवर आणखी ५ ते ७ मिनिटे उकळू द्या, जेणेकरून पानाचा छान सुवास आणि चव दुधामध्ये पूर्णपणे उतरेल. शेवटी त्यात वेलची पावडर आणि कापलेला सुकामेवा घालून गॅस बंद करा.

## वास्तू

### देवघर (पूजाघर) संबंधी

✻ देवघर नेहमी उत्तर-पूर्व (ईशान्य) दिशेला असावे. पूजा करताना आपले तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेकडे असणे सर्वोत्तम मानले जाते.

✻ देवघराजवळ किंवा त्याच्या अगदी वरच्या किंवा खालच्या मजल्यावर कधीही शौचलय नसावे.

## सौंदर्य

गरम खोबरेल तेला मध्ये मेथीचे दाणे घालून ते तापवून घ्या. थंड झाल्यावर टाळूवर चोळून लावल्याने केस मजबूत होतात.

## सल्ला

इडलीचे पीठ आंबवताना त्यात मूठभर पोहे बारीक करून मिसळा, यामुळे इडली लुसलुशीत बनते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६

**भानुसप्तमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, पू.षा.१२|४९, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आजच्या दिवशी कामाच्या ठिकाणी धावपळ वाढेल.

**वृषभ :** वातावरण आनंदी राहील. धनलाभाचे नवीन मार्ग मोकळे होतील.

**मिथुन:** मानसिक अस्वस्थता जाणवण्याची शक्यता आहे. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ मिळणार नाही.

**कर्क :** जुन्या मित्रांची भेट होईल. आरोग्यात सुधारणा दिसून येईल.

**सिंह :** अधिकार क्षेत्रात वाढ होईल. प्रवासाचे योग जुळून येतील.

**कन्या :** शैक्षणिक क्षेत्रात यश मिळेल. कौटुंबिक वातावरण शांत राहील.

**तूळ :** भागीदारीच्या कामात फायदा होईल. वैवाहिक जीवनात गोडवा वाढेल.

**वृश्चिक :** गुप्त शत्रूंचा प्रभाव वाढेल. आर्थिक व्यवहारात अडथळे येतील.

**धनु :** धार्मिक कार्यात सहभाग वाढेल. मान-सन्मानात वाढ होईल.

**मकर :** कष्टाचे योग्य फळ मिळेल. नोकरीत प्रगतीची शक्यता आहे.

**कुंभ :** खर्चात वाढ होण्याचा योग आहे. आरोग्याची स्थिती सामान्य राहील.

**मीन :** मन प्रसन्न राहील. नवीन कार्याची सुरुवात होईल.

## शब्दगंध क्र. ७५३९ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) कोकणातील एक गाव जेथील हापूस आंबा प्रसिद्ध आहे; नेवासा तालुक्यातील दत्तात्रेयाचे मंदिर असलेले एक तीर्थक्षेत्र ४) मोठा सरदार ७) विद्येची देवता; सरस्वती ८) हॉस्पिटल; रुग्णालय ९) काम उद्योगधंदा ; मिळकतीचे साधन ११) न समजता १३) कालवा; नहर १४) वाखाणणी; प्रशंसा १६) सरळ नसलेला; वक्र १८) या चौसष्ट आहेत; आर्ट १९) खरडपट्टी; झाडाझडती २१) एक देवी

**उभे शब्द :-** १) प्रवास; दुसऱ्या देशाला जाणे २) नवरा मुलगा; आशीर्वाद ३) गोंधळ; गडबड; गलका; गलबला ४) पलंग विणण्याची कापडी पट्टी ५) नाश; संकट; महामारी; पटकी ६) घडण; रचना; नकली ८) विश्वासाला तडा; विश्वासघात १०) काळजीपूर्वक रक्षण; संगोपन १२) पक्षी किंवा लहान मुलांचा गोंधळ १३) जल; नीर; जीवन १५) उत्तराधिकारी; हक्कदार १६) लाकूड तासण्याचे सुताराचे हत्यार १७) निष्णात; तरबेज ; प्रवीण १९) मोठ्या बहिणीचे संबोधन २०) एक चर्मवाद्य; शाहिराचे वाद्य

### शब्दगंध क्र. ७५३८ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** वेळ कोणासाठीही थांबत नाही, त्यामुळे वेळेचा सदुपयोग करा आणि आपल्या स्वप्नांना सत्यात उतरवा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मानवी शरीरातील हाडांपेक्षाही जास्त कठीण भाग कोणता?

शरीरात अनेक मजबूत हाडे आहेत जी आपल्या शरीराला आकार देतात आणि आधार देतात. परंतु, एक रंजक गोष्ट म्हणजे आपल्या शरीरात हाडांपेक्षाही अधिक कठीण आणि बळकट असा एक भाग असतो, तो म्हणजे आपल्या दातांवरील बाहेरील पांढरा आणि कठीण थर. मानवी शरीरात हाडे ही सर्वात बळकट मानली जातात कारण ती शरीराचा भार सहन करतात आणि शरीराला आवश्यक ती लवचिकता देतात. परंतु जेव्हा कडकपणा आणि टिकाऊपणाचा विचार येतो, तेव्हा दातांचे हे बाहेरील संरक्षक आवरण सर्व हाडांना मागे टाकते. या आवरणाला अतिशय उच्च दर्जाची घनता लाभलेली असते. यात विविध खनिजांचे आणि क्षारांचे प्रमाण अतिशय दाट असते, ज्यामुळे हा भाग शरीरातील इतर कोणत्याही भागापेक्षा जास्त कठीण बनतो.

यासंदर्भातील एक महत्त्वाची बाब म्हणजे, हाडांमध्ये स्वतःची झीज भरून काढण्याची आणि दुरुस्तीची क्षमता असते, जी या दातांच्या कठीण आवरणात नसते. एकदा का हे बाहेरील कठीण आवरण खराब झाले किंवा झिजले, तर शरीराला ते स्वतः हून परत पूर्वीसारखे तयार करता येत नाही. म्हणूनच निसर्गाने शरीराच्या या अत्यंत महत्त्वाच्या भागाला हाडांपेक्षाही जास्त कठीण बनवले आहे, जेणेकरून मानवाला आयुष्यभर अन्न व्यवस्थित चघळता येईल.

### निसर्गाशी नाते

'आनंदपूर' गावाच्या वेशीवर एक जुने आणि महाकाय वडाचे झाड होते. ते झाड गावाला शुद्ध हवा द्यायचे. गावकरी निसर्गाला आपले कुटुंब मानत असत आणि आनंदाने जगत होते.

एक दिवस शहरातून उच्च शिक्षण घेऊन आलेला तरुण राहुल गावी परतला. त्याला गावाला आधुनिक बनवायचे होते. त्याने गावकऱ्यांसमोर प्रस्ताव ठेवला, रस्ता रुंद करण्यासाठी हे जुने झाड आणि बाजूची झाडे कापावी लागतील, म्हणजे गावाची प्रगती होईल.

गावातील वृद्ध गोपाळ काकांनी सर्वांना खूप समजवले. पण विकासाच्या मोहात पडून गावकऱ्यांनी काकांचे ऐकले नाही आणि ती सर्व झाडे तोडण्यात आली. काही महिन्यांतच पावसाळा सुरू झाला. ज्या भागात झाडे तोडली होती, तिथली जमीन मुळांविना भुसभुशीत झाली होती. पण झाडे तोडलेला संपूर्ण भाग पाण्याखाली गेला आणि मोठे नुकसान झाले.

सकाळी गावकऱ्यांना आणि राहुलला आपली मोठी चूक समजली. त्यांना कळले की सिमेंटची घरे किंवा रस्ते माणसाला जीवन देऊ शकत नाहीत, त्यासाठी निसर्गाचा समतोल असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यानंतर सर्वांनी मिळून पुन्हा नवीन रोपे लावण्याचा आणि त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

बोध : निसर्गाची जोपासना केल्यास जीवन सुरक्षित राहू शकते; निसर्गाचा विनाश म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाचा विनाश आहे.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

त्यांनी आपल्या आत्म्याला कसे जाणून घेतले याचा अभ्यास करून आम्हालासुद्धा आपल्या मूळ स्रोतापर्यंत पोहोचण्याची संधी प्राप्त होते. आत्मबोध कसा घ्यावा ?जागृत आत्मा कोठे आहे? त्याचे मोजमाप व आकार कसा आहे? शरीरात आधी त्याला कोठे शोधले पाहिजे?

जेव्हा आम्ही आत्म्याबद्दल बोलतो तेव्हा आम्ही त्याचे गुणगौरव करतो. परंतु काय आत्म्याचे वर्णन भौतिक पद्धतीने केले जाऊ शकते?आमचा आत्मा भौतिक वर्गाच्या आवाक्या पलीकडचा आहे, कारण तो बाह्य तत्वांचा बनलेला नाही. जड पदार्थाला वजन असते व तो जागा व्याप करतो. आत्मा अदृश्य असून चैतन्यशील आहे. जेव्हा डॉक्टर शरीराची चिरफाड करतात तेव्हा शरीरात जड वस्तू मिळतात. परंतु आत्मा काही मिळत नाही. आत्मा अशा ठिकाणी असतो की जेथे फक्त ज्योती आणि धुनी आहे. परंतु ही ज्योती आणि धुनी भौतिक नाही.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

कारण कौतुक झाल्याने आपल्याला आनंद होत असेलही; पण इतरांपेक्षा वेगळी प्रतिक्रिया मिळाली तर आपण खूपच अस्वस्थ होऊ. आपण एका मुद्द्यावर ठाम असायला हवं – प्रत्येकाला स्वतःचं मत असतं आणि विचारपद्धती असते कारण प्रत्येकाचे संस्कार वेगवेगळे आहेत. त्यामुळे आपल्या मताशी सहमत नसणारं मत एखाद्याने मांडलं तर आपण अस्वस्थ व्हायला नको. आपला दृष्टिकोन पूर्णतः विरुद्ध असला तरीही त्याचा आणि त्याच्या मताचा आदर करायला हवा.

योग्यतेच्या आपल्या व्याख्येशी त्याचं मत जुळलंच पाहिजे हे गरजेचं नाही. जेव्हा आपण एवढे स्थिर, ठाम राह तेव्हा लोक आपल्याशी खरं बोलायला लागतील.

आपण दुसऱ्या बाजूवरही ठाम राहायला हवं. आपण जो विचार करतो तेच आपण बोललं पाहिजे. खोटं बोलून कोणाला खुश करायची गरज नाही. जर आपण कोणाशी खोटं बोललो तर त्याचा आपल्या स्वतःशी असलेल्या नात्यावर नकारात्मक परिणाम होईल.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास – 'मुझे जो सही लगता है...'

जगात अब्जावधी व्यक्ती आहेत. प्रत्येकाचा स्वभाव, विचार, वागण्याची, बोलण्याची पध्दत वेगळी आहे. प्रत्येकजण आपली स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतो, तसं केलं सुध्दा पाहिजे. 'सरकार' चित्रपटातील अमिताभचं पात्रही ह्या जगातील व्यक्तींच्या पात्रांपैकी एक आहे. 'मुझे जो सही लगता है, मैं करता हुँ वो भगवान के खिलाफ हो, समाज के खिलाफ हो . पुलिस, कानुन या पुरे सिस्टम के खिलाफ क्यों न हो ।' खरंच एखादी व्यक्ती अशी असु शकते? हा प्रश्न हा संवाद ऐकल्यानंतर मनात येणं अगदी स्वभाविक आहे. असं म्हणतात कुणीही शंभर टक्के परिपूर्ण नसतो. पण 'मुझे जो सही लगता है...' हा संवाद फक्त अशाच व्यक्ती बोलु शकतात ज्या स्वतःशी शंभर टक्के प्रामाणिक असतात. स्वतःशी प्रामाणिक असणाऱ्या किती व्यक्ती आहेत ? नक्कीच हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्याच असतील पण आहेत हे नक्की. मी जर स्वतः ला पुर्णता ओळखत नसेल तर ? मी प्रामाणिकपणे विचार, आचार करत नसेल तर? मला वाटतं ह्याचे परिणाम सांगण्याची गरज नाही.

समजा एखाद्या अपार्टमेंटमध्ये पन्नास फ्लॅट आहेत. अंदाजे एकशे पन्नास अथवा १५० पेक्षा कमी, अधिक व्यक्ती त्या अपार्टमेंटमध्ये राहात असतील. प्रत्येक व्यक्ती विचार, आचार, स्वभाव, मनाने वेगळीच असणार ह्यात तिळमात्र शंका नाही. एका घरात राहणारे कधीकधी एकसारख्या विचारांचे नसतात. मग इथं तर पन्नास कुटुंब आहेत. पण ह्या पन्नास कुटुंबातला असा एखादा असेल जो म्हणेल, 'मुझे जो सही लगता है, मै करता हूँ.' कारण प्रत्येकाचा प्रत्येक विचार, कृती, व्यक्ती, घटनेकडे पाहण्याचा, दृष्टीकोन वेगवेगळा असतो. ह्यामध्ये सर्वात महत्वाचं आहे ते शिक्षण. तुम्ही किती शिक्षण घेतलं आहे ह्यावरुन आपल्याला साधारण सदर व्यक्ती सोबत कसं बोलावं, वागावं ह्याचा अंदाज येतो. एखादी व्यक्ती कमी शिकलेली असते पण चांगल्यापैकी शिक्षण झालेल्या व्यक्ती अथवा व्यक्तींच्या सहवासात राहुन चांगलं बोलणं, वागणं शिकु शकते. म्हणजेच त्याच्यादृष्टीने ते 'सही' आहे अर्थात योग्य आहे. महत्वाचं म्हणजे योग्य अयोग्यची समज आपल्याला शिक्षणामधुन मिळते तसं अनुभवातुनही मिळते. काही वेळा आपण एखाद्याविषयी समज तर कधी गैरसमजही करुन घेतो. जेव्हा आपण त्या व्यक्तीसोबत एखाद्या गैरसमजाविषयी बोलतो तेव्हा नेमकं 'सही' काय आहे हे समजतं.

वो चाहे भगवान के खिलाफ हो, समाज के खिलाफ हो, पुलिस, कानुन या पुरे सिस्टम के खिलाफ क्यों ना हो – असं बोलतो तेव्हा आपण नक्कीच विचार करतो की ही व्यक्ती एवढी ठाम आहे की ती व्यक्ती जे काही करते आहे ते शंभर टक्के बरोबरच आहे. त्या व्यक्तीला परमेश्वर, समाज, कायदा ह्यांच्याविषयी काहीही वाटत नाही असं नाही. प्रश्न असा आहे की हे असं बोलणं खरं / योग्य असु शकतं का? तर नक्कीच असु शकतं. कारण मला जे योग्य वाटतं तेच मी करतो मग ते परमेश्वराच्या विरोधात असो, समाज, पोलिस, कायदा ह्याच्या विरोधातही असु शकेल. ह्याचाच अर्थ त्या व्यक्तीने सर्वांगीण विचार करुन तशी कृती करण्याचा निर्णय घेतला आहे. कदाचित त्याला योग्य वाटणारी कृती विचार परमेश्वर, पोलिस, कायदा, समाज ह्यांच्या विरोधातही असेल. खरं तर हे असं असु शकतं, होऊ शकतं. कारण प्रत्येकाच्या मनात येणारा विचार हा वेगळा असु शकतो. त्याने केलेली कृतीही वेगळी असु शकते. मी काय विचार आणि कृती करावी हे सर्वस्वी माझ्याच हातात आहे.

पण एखादा विचार, एखादी कृती प्रत्येकवेळी स्वतःसाठी नसतेच. त्या विचार, कृतीमुळं त्या व्यक्तीशिवाय अनेकांचं भलं होणारं असु शकते. म्हणून त्या विचार, कृतीमध्ये आपल्याला माहित नसतं की इतरांचं भलं होणार आहे म्हणून आपण त्या व्यक्तीला वेगळं असं करतो आहेस असं म्हणु शकतो. म्हणजेच त्या व्यक्तीच्या त्या वाक्यांमागचा अर्थ अथवा कृती आपल्याला माहित नसते अथवा आपल्याला त्या व्यक्तीविषयी, त्या व्यक्तीच्या आचार- विचाराविषयी काहीच माहित नसते. अथवा ती व्यक्ती परमेश्वर, कायदा, समाज ह्यांच्यापेक्षा स्वतःला मोठी समजते असं आपण समजु लागतो.

खरं तर ती व्यक्ती तिच्या दृष्टीने, तिच्या स्वतःच्या जागेवर योग्य आहे आणि 'सही' आहे असं करणारच आहे. पण आपण एक अशी मान्यता गृहित धरुन आहे की असं विधान बोलणारी व्यक्ती आजपर्यंत आपण पाहिली नाही मग हे कसं शक्य आहे ? स्वतःसोबत शंभर टक्के प्रामाणिक असणारी, स्वतःच्या तत्वांशी तडजोड न करणारी, स्वतःच्या जगण्याचे नियम – सुत्र असणारी आणि विचार – आचारात ठाम असणारी, आत्मविश्वासु व्यक्तीची भूमिका अमिताभ ह्यांनी केली आहे. म्हणूनच त्यांच्या तोंडुन तो संवाद ऐकतांना त्यांच्या डोळ्यातला प्रामाणिकपणा, स्वतःवरचा विश्वास आणि शब्दांमधला ठामपणा आपल्याला थेट भिडतो. अशा व्यक्ती जगात आहेत हे दाखवण्याचा अमिताभ ह्यांच्या भूमिकेचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. (लेख क्र.६२२)

– **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

बाबा : बघ, रमेश किती हुशार आहे, त्याला परीक्षेत ९०% गुण मिळाले!

बंट्या : बाबा, प्रश्नपत्रिकाही तर शिक्षकांनीच काढली होती ना, मग कौतुक त्यांचं करायला पाहिजे!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ महाराष्ट्राच्या पहिल्या महिला राज्यपाल कोण होत्या?

– पद्मजा नायडू

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

२) अभ्यंतर स्नेहन : विशिष्ट औषधीद्रव्यांनी सिद्ध केलेले तूप पिण्यास देणे यालाच अभ्यंतर स्नेहन असे म्हणतात.

ब) स्वेदन : विशिष्ट औषधीद्रव्यांनीयुक्त वाफ शरीराला देणे याला स्वेदन म्हणतात. शाखागत झालेले प्रकुपित दोष या पूर्वकर्मामुळे कोष्ठात (पोटात) आणली जातात.

पंचकर्म – वमन, विरेचन, बस्ती, नस्य, रक्तमोक्षण ही पाच कर्मे आयुर्वेदशास्त्रातील पंचकर्म आहेत.

१) वमन : औषधीयुक्तद्रव्ये देऊन उलटी करविण्याच्या प्रक्रियेस वमन असे म्हणतात. शरीराच्या उर्ध्वभागातील दोष, कफ प्रकुपित दोष शरीराबाहेर काढण्यासाठी वमनाचा उपयोग होतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

# भिंगारच्या छावनी परिषद हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक एक्स-रे मशीनचे लोकार्पण

**अवघ्या ९० रुपयांत एक्स-रे सुविधा; सर्वसामान्य रुग्णांनी लाभ घ्यावा**

नगर – भिंगार छावणी परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक एक्स-रे मशीनचे लोकार्पण करण्यात आले. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने आपल्या सीएसआर निधीतून हे मशीन उपलब्ध करून दिले आहे. या सुविधेमुळे भिंगार शहर व परिसरातील नागरिकांना कमी खर्चात आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.

छावणी परिषदेचे उपाध्यक्ष वसंत राठोड यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, भिंगार परिसरात एक्स-रेची सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना इतर ठिकाणी जावे लागत होते. खासगी रुग्णालयांत एक्स-रेसाठी ५०० ते ८०० रुपये खर्च येत असताना, छावणी परिषद रुग्णालयात केवळ ९० रुपयांत ही सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे गरीब व सर्वसामान्य रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, परिसरातील नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.



छावनी परिषद हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक एक्स-रे मशीनचे लोकार्पण करताना वसंत राठोड.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे सीएसआर विभागप्रमुख योगेश गुरधाळकर यांनी रुग्णालयाला भविष्यात आवश्यक असणारी अन्य साधनसामग्री उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रुग्णालयाच्या नर्सिंग स्टाफ श्रीमती नीलम परदेशी यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार छावणी परिषद शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी केले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सद्दाम कच्छी, डॉ. धनंजय गुंड, छावणी परिषदेचे शिशिर परदेशी, गणेश भोर, प्रवीण शिंदे, योगेश बोरुडे, उद्योजक श्री. मुथा यांच्यासह रुग्णालयाचे कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. डॉ. धनंजय गुंड यांनी आभार मानले.

सीएसआरच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या या सुविधेमुळे भिंगार परिसरातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात आरोग्यसेवा मिळणार असून, रुग्णालयाच्या सुविधांमध्ये महत्त्वाची भर पडली आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

**गर्व हे उद्धटपणाचे मूळ**







कुणाकुणाला कशाकशाचा गर्व . जैन आचार्य कुन्दकुन्द बारस अणुवेक्रवा ग्रंथात म्हणतात. कुणाला आपल्या कुळाचा गर्व, तर कुणाला रूपाचा. कुणाला आपल्या जातीचा, तर कुणाला बुद्धीचा. कुणाला तपश्चर्येचा तर कुणाला विद्वतेचा. स्वभाव माझा चांगला, शील माझंच उत्तम हा तर गर्व बहुतेकांना. संपत्तीचा आणि बळाचा गर्व काय नव्याने सांगायचा ?

आचार्यांनी सांगितला नाही, तोही एक गर्व आढळतो ना? मला मुळीच -गर्व नाही हो कशाचा, याचाच गर्व साचा. गर्व म्हणजे उद्धटपणाचे मूळ. ते फेकावे काढून समूळ. कुळामुळे माणूस नव्हे, तर माणसाच्या कर्तृत्वामुळे होते कूळ मोठे, रूप तर फसवे. जाति म्हणजे जन्म. हा तर सगळ्यांचाच समान. मग कशाला जातीचा व्यर्थ अभिमान ? बुद्धीसुद्धा सर्वांना सारखीच देतो देव. मग तूच का समजतोस स्वतःला बुद्धिमान एकमेव ? धन तर आज आहे, उद्या नाही. म्हणूनच जातीचा. कुळाचा, बुद्धीचा, विद्वतेचा नसता गर्व करणाऱ्यांची संतांनी निंदाच केली आहे. संत सेना महाराज म्हणतात.

उंच कुळामाजी वर्ततो चांडाळ । आचार हा फोल मानीतसे।

मोठ्या कुळात जन्मल्याचा गर्व, पण कर्म करी चांडाळाचे. मानवतेचा आचार सर्वांप्रती कणव, ती त्याच्या गावी नेते.

संत एकनाथ महाराज म्हणतात, सांडोनी आचार करती अनाचार। ब्रह्माचा विचार न कळे ज्यासी।। वाहाती भारा वेदाचा आधार। शास्त्रांचा संभार सांगताती।

स्वतःला ज्ञानी, विद्वान समजणाऱ्यांना कुठे कळते की आत्मा सर्वत्र एकच आहे. मी तू पणाचा भेदभाव मूर्खपणाच आहे. वेद समजले म्हणून गर्व वाहायचा आणि स्वार्थाचा बाजार मांडायचा. काय उपयोग असल्या तपश्चर्येचा ? विद्येच्या नावाखाली अविद्येचाच पसारा माजवायचा. अरे, तुझ्यापेक्षा अडाणीच कामाचा.

जात, कूळ, विद्या, धन यापायी येणाऱ्या मोठेपणाच्या नसत्या उन्मतपणासंदर्भात संत तुकाराम महाराज म्हणतात, नीचपणा बरवे देवा न चले कोणाचाही हेवा । मोठेपणा नको देऊ देवा. जाती-कुळामध्ये मला कुणी नीच म्हटले, तर नाही दुःख मुळी. जन्म, ज्ञान, धन बुद्धी ज्यांच्याजवळ ते सदा हेवा करतात एकमेकांचा आणि करतात अकल्याण स्वतःचे आणि दुसऱ्याचेही. जो असा उभयपक्षी अकल्याण साधतो, त्यालाच गर्व म्हणतात. तो कधीही नसावा.

एक होता खरा ज्ञानी. तो न कुळाला, न रूपाला मानी. राहायचा चिंध्या पांघरोनी, दिसायचा अमंगळवाणी. त्याला भेटला एक गर्विष्ट. आपल्या विद्वतेचा व जातीचा नसता अभिमानी. त्या खऱ्या ज्ञान्याला तो म्हणाला, अरे ज्यानं तुझं तोंड पाहिलं अमंगळ त्याच्या नशिबी खचितच नरकवास असे. खरा ज्ञानी म्हणाला, मला पाहील तो नरकात जाईल. आणि काय रे सज्जना, तुला पाहील तो कुठे जाईल ? तो उन्मत म्हणाला, जो मला पाहील, तो स्वर्गाला जाईल.

त्यावर ज्ञानी खदखदून हसला व म्हणाला, चला म्हणजे माझा स्वर्ग तर नक्की झाला. पण अरेरे, तुझ्या नशिबी नसता नरकवास आला. तो गर्विष्ठ एकदम उमजला व म्हणाला, अरेरे गर्वाच्या भरात काय बोललो मी.

**– किशोर गांधी**

# रिक्षा युनियनचा वाद उफाळला; दोघा रिक्षा चालकांना मारहाण

नगर – रिक्षा युनियनचा वाद उफाळला असून याच कारणावरून दोन रिक्षा चालकांना बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. वारुळाचा मारुती कमान परिसर, वेताळबाबा मंदिरासमोर, नालेगाव येथे हा प्रकार घडला. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिक्षाचालक निलेश शरद कांबळे (वय ३६, रा. नालेगाव हडको) यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी अकराच्या सुमारास हा प्रकार घडला होता. तर १६ ऑक्टोबर रोजी रात्री उशिरा तोफखाना पोलीस ठाण्यात यासंदर्भातील नोंद करण्यात आली.

आरोपी गणेश भाऊसाहेब आटोळे आणि शंकर भाऊसाहेब आटोळे (दोघे रा. गाडगीळ पटांगण, अमरधामजवळ) अशी आरोपींची नावे आहेत. रिक्षा युनियन चालवण्याच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीसोबत वाद घातला. वादादरम्यान आरोपींनी फायबरच्या दांड्याने डोक्यात मारहाण करून जखमी केले. या हल्ल्यात फिर्यादी निलेश कांबळे आणि त्यांचा मित्र तेजस राम भगत (रा. काळभैरवनाथ मंदिर, बोल्हेगाव) हे दोघे जखमी झाले. मारहाण केल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. जखमींना उपचारासाठी अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई सुरू आहे.

# मॉल, मल्टिप्लेक्स, हॉटेल्स, रेस्टॉरंट, पेट्रोल पंपांमध्ये महिलांसाठी मोफत स्वच्छतागृह हवे

**महिला व बालकल्याण समिती सभापती दिपाली बारस्कर यांची मागणी**

नगर – शहरातील मॉल, मल्टिप्लेक्स, हॉटेल्स, रेस्टॉरंट, पेट्रोल पंप तसेच इतर व्यावसायिक आस्थापनां-मध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहांची सुविधा विनामूल्य उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांनी आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरात विविध कामांसाठी येणाऱ्या महिला व मुलींना स्वच्छतागृहांच्या अभावामुळे होणारी गैरसोय दूर करण्यासाठी महानगरपालिकेने संबंधित आस्थापनांना आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे.



मॉल, मल्टिप्लेक्स, हॉटेल्स, रेस्टॉरंट, पेट्रोल पंप तसेच इतर व्यावसायिक आस्थापनांमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहांची सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्याच्या मागणीचे निवेदन आयुक्त यशवंत डांगे यांना देताना महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर.

बारस्कर यांनी निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरात शिक्षण, नोकरी, व्यवसाय, खरेदी, आरोग्यसेवा तसेच इतर विविध कामांसाठी दररोज मोठ्या संख्येने महिला व मुली ये-जा करतात. ग्रामीण भागातूनही अनेक महिला विविध कामांसाठी शहरात येतात. मात्र, त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि सहज वापरता येतील अशी स्वच्छतागृहे उपलब्ध होत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. शहरातील अनेक व्यावसायिक आस्थापनांमध्ये स्वच्छतागृहांची सुविधा असली, तरी ती सर्वसामान्य महिलांना सहज उपलब्ध होत नाही.

अनेक ठिकाणी स्वच्छतागृह वापरण्यासाठी परवानगीची अट घातली जाते, तर काही ठिकाणी शुल्क आकारले जाते. तसेच काही ठिकाणी कर्मचाऱ्यांकडून अडवणूक होत असल्याने महिलांना गैरसोयीला सामोरे जावे लागते. ही अडचण दूर करण्यासाठी महानगरपालिकेने शहरातील मॉल, मल्टिप्लेक्स, हॉटेल्स, रेस्टॉरंट, पेट्रोल पंप आणि इतर व्यावसायिक आस्थापनांच्या मालकांना महिलांसाठी असलेली स्वच्छतागृहे विनामूल्य वापरासाठी खुली करण्याचे आवाहन करावे. यासंदर्भात संबंधित विभागांना योग्य त्या सूचना देऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी बारस्कर यांनी केली आहे.

# नगर शहरात १८ ऑक्टोबरला 'आनेवाला पल' गीतांची मैफिल



नगर – जुन्या हिंदी चित्रपट गीतांच्या सुरेल आठवणींना उजाळा देणारा 'गाता रहे मेरा दिल ग्रुपतर्फे अमीन धारानी प्रस्तुत 'आनेवाला पल' हा संगीतमय गीतांची मैफलीचे १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता प्रोफेसर कॉलनी चौक येथील रोज गोल्ड हॉल शिंगवी ज्वेलर्स च्या खाली सावेडी येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात निलेश गाडेकर, धनंजय आरडे, दीप भालेराव, मुकुंद ढोले, संदीप सोनसळे, मयुरी ढोले, सुनील भंडारी, जयंत पाठक, राजेश आरे, वृषाल एकबोटे, मुकेश कुलथे, डॉ. संजय वायकर, माधवी गुजर, मीनानाथ मैड, चारू ससाने, डॉ.विवेकानंद कंगे, श्री.शिवगुंडे, मंगेश भुते, बालाजी गंगेकर, अमिन धारानी हे कलाकार गीते सादर करणार आहे.

जुन्या हिंदी चित्रपटांतील सदाबहार गीतांचा आनंद रसिकांना घेता यावा आणि संगीताच्या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा मिळावा, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहून गीतांचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक अमीन धारणी यांनी केले आहे

# मुस्लिम वधू-वर मेळाव्याचे १८ ऑक्टोबर रोजी आयोजन




नगर – मुस्लिम समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींना योग्य जीवनसाथी निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते ३ वाजे पर्यंत अहमदनगर येथे मुस्लिम वधू-वर मेळाव्याचे आयोजन रहेमत सुलतान हॉल सर्जेपुरा अहमदनगर येथे करण्यात आले असल्याचे युनुसभाई तांबटकर यांनी सांगितले.

विवाहेच्छुक युवक-युवती तसेच त्यांच्या पालकांसाठी हा मेळावा एक संधी ठरणार आहे. विवाहासाठी योग्य स्थळ शोधताना येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात, कुटुंबांना एकमेकांशी प्रत्यक्ष संवाद साधता यावा आणि योग्य स्थळ निवडण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, हा या मेळाव्यामागील मुख्य उद्देश आहे असे आरिफ सय्यद यांनी सांगितले.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी येणाऱ्या माता-पित्यांनी आपल्या मुला-मुलींचे फोटो, बायोडाटा आणि फोटो कम्पल्सरी सोबत आणणे आवश्यक असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.

या वधू-वर मेळाव्याची माहिती रहमत सुलतान मॅरेज ब्युरो, सर्जेपुरा, अहमदनगर यांच्या वतीने देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी आरिफ सय्यद (८८०५० ५९९९५) आणि शफकत सय्यद (९८५०६ ८७८६८) यांच्याशी संपर्क साधावा.

मुस्लिम समाजातील विवाहेच्छुक युवक-युवती व त्यांच्या पालकांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन शफकत सय्यद यांनी केले आहे.

# वसंत पुंड यांना पीएच. डी. पदवी प्रदान



नगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून वसंत लक्ष्मण पुंड यांना मराठी विषयातील दिनेश काळे यांच्या साहित्यातील महानगरीय जीवन जाणिवा या संशोधन विषयासाठी पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

वसंत पुंड यांनी हे संशोधनकार्य गांधी महाविद्यालय, कडा येथील मराठी विभाग प्रमुख, प्रो. डॉ. अनिल गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले त्यांनी दिनेश काळे यांच्या कथा, कादंबरी व नाटक या साहित्यातील महानगरीय जाणिवांचा अभ्यास केला. मुंबई महानगरातील सर्वसामान्य माणूस, मध्यमवर्गीय नोकरदार यांच्या संवेदना, मूल्यऱ्हास, असुरक्षितता, उपरेपणा, संघर्ष, मेटाकुटीला आलेले जीवन, अहोरात्र कष्ट करूनही पोट भरत नाही हे वास्तव मांडले. त्यांचे हे संशोधन कार्य नवोदित अभ्यासकांना दिशादर्शक ठरेल.

याप्रसंगी मराठी विभागप्रमुख वरिष्ठ प्राध्यापक डॉ. रमेश जाधव, प्रो. डॉ. आनंद वाघ, आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या मराठी संशोधन केंद्राचे संचालक प्राचार्य डॉ. विधाते एच.जी., मराठी संशोधन केंद्राचे समन्वयक प्रो. डॉ. गोपीनाथ बोडखे, प्राचार्य डॉ. निवृत्ती मिसाळ, प्राचार्य डॉ. भानुदास चोपडे, योगेश जपे, दत्ता कोकाटे, सिद्धार्थ जाधव मित्र परिवारांनी वसंत पुंड यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# सुखी दांपत्याचा मंत्र: 'ब्लिसफुल कपल' शिबिरातून मिळाली जीवनदृष्टी

गेल्या तीन आठवड्यांच्या ब्लिसफुल कपल शिबिरात उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांनी वैवाहिक जीवन सुखी करण्याचे सोपे आणि व्यावहारिक मार्ग उलगडून सांगितले. शिबिरार्थी प्रीती मुथियान यांनी टिपलेल्या मुद्द्यांवरून या शिबिराचे सार सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न....

**पहिला आठवडा : पहिला संकल्प आणि सुख देण्याची कला**

शिबिराच्या पहिल्या दिवशीचा पायाभूत संकल्प होतामी माझ्या जोडीदाराच्या विकासासाठी जबाबदार आहे. जोडीदाराला बदलण्याआधी त्याच्या वाढीची जबाबदारी स्वतः घ्यायची, हीच संपूर्ण शिबिराची दिशा ठरली.

गुरुदेवांनी सांगितले, सुख हवे असेल तर सुख द्यायलाही शिका. केवळ जोडीदाराकडून सुखाची अपेक्षा करत राहण्यापेक्षा आपण त्याला काय सुख देतो हे पाहणे महत्त्वाचे आहे. पती-पत्नी एकमेकांचे सुख-दुःख वाटून घेण्यासाठी असतात, आणि जितकी शेअरींग खोल, तितके नाते खोल होते.

आपल्या समस्या, अडचणी आधी आपल्या आयुष्याच्या जोडीदाराबरोबरच शेअर करा. प्रत्येक गोष्ट आई-वडील, सासरचे किंवा मित्रांना सांगण्याची गरज नाही. कारण असे वारंवार केल्याने आयुष्यात तिसरी व्यक्ती येण्याची शक्यता वाढते आणि त्यामुळे जीवनात आणखी समस्या निर्माण होतात.

शिबिराची सुरुवात एकमेकांना शुभेच्छा देऊन झाली. वाद आणि तक्रारी आपण नेहमी करतो, पण एकमेकांना सदिच्छा किती वेळा देतो? ७ दिवसांच्या प्रॅक्टिसमध्ये लग्नाच्या दिवसापासूनचा प्रवास आठवायचा होता: कोणत्या गोष्टींनी दुखावले गेलो आणि कोणत्या क्षणांनी आनंद दिला. ही तक्रारींची यादी नव्हे, तर संपूर्ण प्रवास पाहण्याची प्रॅक्टिस आहे.

पॅटर्न बदलण्याचाही संदेश मिळाला. एकच भांडण रोज होत असेल, तर ती सवय बनते. सेम फाईट, सेम पॅटर्न, सेम रिझल्ट नवी मंजिल हवी तर रस्ताही नवा हवा. भांडणानंतर ५-१० मिनिटांत सॉरी, धन्यवाद, आय लव्ह यू म्हणावेसे वाटले तर लगेच म्हणा. सॉरी म्हणणे कमजोरी नाही, ती भावनिक ताकद आहे. लोक काय म्हणतील? हा सर्वात मोठा रोग आहे. तिसऱ्या व्यक्तीच्या हातात आपल्या संसाराचे सारथ्य देऊ नका आणि इतरांसमोर जोडीदाराचा अपमान करून स्वतःच्या नात्याचे मूल्य कमी करू नका.

**दुसरा आठवडा : श्रद्धा, मनातील काटा आणि भांडण्याची कला**

श्रद्धा हा नात्याचा पाया आहे, तिच्याशिवाय नाते पत्त्यांच्या बंगल्यासारखे असते. पती-पत्नी सहप्रवासी आहेत, एकाला मागे ओढून प्रवास पूर्ण होत नाही. पायात काटा रुतला असताना वर फूल ठेवले तर वेदना जात नाहीत, तसेच नात्यातील खोल जखम दाबून संपत नाही, आत रूतलेला काटा बाहेर येणारच. रडावेसे वाटले तर रडा, कारण भावना दाबून धरणे विषासारख्या असतात. ऐका, समजून घ्या, सोडून द्या आणि पुढे चालत रहा.

दिवा लावणे एका सेकंदाचे काम आहे, पण तो आयुष्यभर तेवत ठेवावा लागतो. चुकीची गोष्ट एकदम मोठी होत नाही, तिला हळूहळू जागा दिली जाते. म्हणून समस्या सीमेवरच थांबवा. खरा सिंह प्रत्येक गोष्टीला उत्तर देत नाही, केव्हा गप्प राहायचे हे ओळखतो. शिबिरात एक संकल्पही दिला गेला:



३ ऑक्टोबर २०२६ पूर्वीची जोडीदाराबरोबरची कोणतीही घटना जिभेवर आणायची नाही.

ज्याच्याशिवाय राहू शकत नाही त्याच्याशी मतभेद होणारच, म्हणून योग्य पद्धतीने भांडायला शिका: सत्य, शिव आणि सौंदर्य या सूत्राने. भांडण दोघांपुरतेच खाजगी असावे, बेडरूम, डायनिंग हॉल, स्वयंपाकघर आणि मुलांसमोर नको, गार्डन किंवा टेरेसवर उत्तम. समोरासमोर नव्हे तर बाजूबाजूला बसा, कारण आपण एकमेकांविरुद्ध नाही, समस्ये विरुद्ध आहोत. एका वेळी एकच मुद्दा घ्या, जुन्या गोष्टींची चार्ज नीट नको. भांडणाचे ध्येय जिंकणे नाही, तर नाते वाचवणे आहे. दररोज किमान एक मिनिट नवकार मंत्र पठण करण्याचा मार्गही गुरुदेवांनी सांगितला.

**तिसरा आठवडा : कौतुक आणि अभिनंदन पत्र**

परिपूर्णता एका दिवसात येत नाही, वारंवार करेक्शन आणि प्रॅक्टिस लागते. सदाचाराची चर्चा खूप होते, पण ते जीवनात आणण्यासाठी सिस्टीम बनत नाही. नात्याच्या बहरण्याचे तीन तत्व: सुरक्षा, संवर्धन, सेलिब्रिशन. मुलाने अभ्यास केला नाही हे आपण लगेच सांगतो, पण जे केले त्याचे कौतुक विसरतो. बाभळीचे झाड काढले तर त्या जागी चांगले झाड लावा, म्हणजे चुकीच्या सवयी बाहेर काढताना चांगल्या सवयी वाढवा. गाडीची सर्व्हिसिंग करतो तशी नात्याचीही सर्व्हिसिंग हवी.

यासाठी गुरुदेवांनी अभिनंदन पत्राचा उपक्रम दिला. जोडीदाराचे चांगले गुण, त्याने केलेल्या गोष्टी आणि सुखद प्रसंग यांची यादी करून लाल, गुलाबी आणि केशरी रंगांत सुंदर पत्र बनवायचे आणि त्याला द्यायचे. माहिती + भावना + = ऊर्जा, म्हणजे कौतुकास्पद बोला, लिहा आणि वर्तनातून दाखवा. जोडीदाराला माझे जीवनसाथी, माझे हमसफर, माझी प्रिय असे संबोधा, कारण नाव ओळख देते, पण नात्याचे संबोधन आपलेपणा जागवते.

जो आधी देतो आणि नंतर घेतो तो सावकार, जो आधी घेतो आणि नंतर देतो तो कर्जदार. जे द्याल तेच मिळेल. नात्यांमध्ये आधी प्रेम, सन्मान, वेळ आणि आपलेपण द्या.

**तिसरा आठवडा (दिवस ३) : आठवणीत ठेवा, जांबवंत व्हा**

अभिनंदन पत्र फ्रेम करून डायनिंग हॉलमध्ये लावा, म्हणजे ते रोज नजरेसमोर राहील. रिमाइंडर + रिव्हिजन = बेहतर स्मरण आणि वर्तनात बदल. आपल्याला जुन्या तक्रारी लक्षात राहतात आणि जोडीदाराची चांगली कामे विसरतो, म्हणून नकारात्मक आठवणी अधिक ताकदीच्या वाटतात. नकारार्थी गोष्टी आपोआप पसरतात, पण सकारात्मक पसरवण्यासाठी सातत्य लागते. जोडीदाराकडून मिळालेले प्रेम, सन्मान आणि सुख केवळ आठवू नका, ते गांभिर्याने अनुभवा.

स्वतःला कधीही परिपूर्ण समजू नका. तत्वज्ञान समजणे आणि ती जगणे या वेगळ्या गोष्टी आहेत, सच्ची साधना म्हणजे निरंतर अभ्यास, आत्मनिरीक्षण, करेक्शन आणि प्रगती. फॉलो अप, रिमाइंडर आणि रिव्हीजन हे दैनंदिन जीवनाचा भाग बनले पाहिजेत.

शिबिराचा सर्वात हृदयस्पर्शी संदेश: दाम्पत्यानी एकमेकांचे जांबवंत बनायचे आहे. जांबवंतांनी हनुमानजींना त्यांची शक्ती आठवून दिली होती. तसेच आपण जोडीदाराची क्षमता ओळखून त्याला सांगायचे: तुम्ही करू शकता. मी तुमच्या सोबत आहे. आत्मविश्वास डळमळला असेल तेव्हा टीका नव्हे, विश्वास, सहकार्य आणि प्रोत्साहन हवे. नात्यात अशी सुरक्षित जागा हवी, जिथे अपयशी झालो तर कोण सांभाळेल? हा प्रश्न उरत नाही, जिथे चूक करता येते, शिकता येते आणि पुन्हा प्रयत्न करता येतो. साथ फक्त यशातच नव्हे, अपयशानंतरही दिसली पाहिजे. आणि फक्त सांगण्याऐवजी म्हणा: चला, आपण मिळून करूया.

**सर्व जोडप्यांना आवाहन**

या सर्व अनुभवानंतर माझे सर्व जोडप्यांना हृदयपूर्वक आवाहन आहे: नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या पुढील ब्लिसफुल कपल शिबिरात अवश्य सहभागी व्हा. दोघे मिळून या. तक्रार करण्यापूर्वी कदर करणे शिका, नाते फक्त निभावू नका, ते संवर्धित करा. एकमेकांसाठी काटा नाही, सहारा बना.



**– प्रिती सी. मुथियान,**
**संस्थापिका,**
**प्रीतीज पाठशाळा, नगर**

# जलसंवर्धन : पाण्याची बचत काळाची गरज...

आपणांस कल्पना आहे की, पृथ्वीच्या एकूण पृष्ठभागाच्या ७१% भाग हा पाण्याने व्यापलेला आहे, तर २९% भाग हा जमिनीने व्यापलेला आहे. पृथ्वीच्या उपलब्ध पाण्यापैकी फक्त २.५% ते ३% पाणी हे गोडे पाणी आहे.

**गोड्या पाण्याचे प्रकार : हिमनद्या आणि बर्फ.**

**हिमनद्या आणि बर्फ :** गोड्या पाण्यापैकी ६८ ते ६९ % पाणी हे उत्तर आणि दक्षिण ध्रुवावर बर्फ किंवा हिमनद्यांच्या स्वरूपात साठलेले आहे.

**भूजल :** जमिनीखालील पाण्याचे प्रमाण गोड्या पाण्याच्या फक्त ३०% इतके आहे.

**उपलब्ध पृष्ठभागावरील पाणी**
**(नद्या, तलाव आणि गोडे पाणी) :**

नद्या तलाव आणि इतर स्त्रोतांमध्ये मिळून गोड्या पाण्याचा फक्त १ टक्क्यांपेक्षाही कमी भाग उपलब्ध आहे. तथापि जागतिक तापमान वाढ आणि वाढती लोकसंख्या या कारणामुळे पाण्याची टंचाई दिवसेंदिवस तीव्र होत चालली आहे. जर आपण आज पाणी वाचवले नाही तर सर्व जीवसृष्टींचे भवितव्य धोक्यात येईल.

**पाणी टंचाईची कारणे आणि दाहकता :**

नैसर्गिक समतोल दिवसेंदिवस बिघडत चालल्यामुळे निसर्गाचे ऋतुचक्र (उन्हाळा, पावसाळा, हिवाळा) सुद्धा बदलताना दिसते आहे. तापमानवाढीमुळे जमिनीवरील पाण्याची पातळी सुध्दा झपाट्याने खाली जात आहे. आजकाल शहरीकरणात पाण्याचा अमर्याद उपसा आणि अपव्यय होत असल्यामुळे उन्हाळ्यात अनेक गावांना आणि शहरांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो.

**जलसंवर्धनासाठी प्रभावी उपाययोजना :**

घरातील पाण्याचा अनेक मार्गाने होणारा अपव्यय टाळा. उदा.

१) दात घासताना किंवा दाढी करताना सतत चालू असलेला नळ बंद ठेवल्यास शेकडो लिटर पाण्याची बचत होते.

२) घरात किंवा बाहेरगळती असलेले नळ, पाईप किंवा फ्लश त्वरित दुरुस्त केले किंवा त्वरित बदलले तर हजारो लिटर पाण्याची बचत होईल.

**३) शावर ऐवजी बादलीचा वापर :**

पाणीटंचाईमध्ये आंघोळीसाठी शावर चा वापर न करता बादली आणि मग चा वापर केल्याने बऱ्याच प्रमाणात पाणी बचत होते.

**४) भाजी धुण्यासाठी भांडे वापरा :** नळाच्या वाहत्या


















पाण्याखाली भाजी धुणे ऐवजी एका भांड्यात पाणी घेऊन त्यात भाज्या धुवा आणि तेच पाणी झाडांना द्या.

**५) वाहने किंवा गाड्या धुण्यासाठी बादलीचा वापर :**

वाहने धुताना पाईप ऐवजी बादली वापरली तर बऱ्याच प्रमाणात पाण्याची बचत होते.

**६) शेतीस व बाग कामांसाठी पाणी देण्यासाठी :**

**सूक्ष्म सिंचन पद्धतीचा अवलंब :**

पिकांना व बागांना पाण्याचा काटकसरीने व योग्य पुरवठा करण्याच्या दृष्टीने ठिबक सिंचन किंवा तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब करावा त्यामुळे पाण्याची जवळपास ५० टक्के बचत होईल.

**७) आच्छादन (Mulching) वापरा :** बाष्पीभवन रोखण्यासाठी फळपिकांपोवती प्लास्टिक किंवा शेतातील

पालापाचोळा यांचे आच्छादन घाला.

**८) सेंद्रिय खतांचा वापर :** जमिनीची जलधारण क्षमता वाढवण्यासाठी रासायनिक खतांचा वापर न करता फक्त सेंद्रिय खतांचा वापर करावा.

**९) सकाळी किंवा संध्याकाळी पाणी द्या :** बागेतील झाडांना लोनला पाणी द्यायचे झाल्यास सकाळी लवकर किंवा संध्याकाळी द्या जेणेकरून उन्हामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी होईल व बऱ्याच प्रमाणावर पाण्याची बचत होईल.

**१०) रेन वॉटर हार्वेस्टिंग** (Rain water harvesting) **:** पावसाचे पाणी छतावरून पाईप द्वारे जमिनीत जिरवा अथवा

विहीर किंवा बोअरच्या पुनर्भरणासाठी वापरा किंवा छतावरील पाणी टाकीमध्ये साठवून ठेवा. ते टंचाईत वापरता येईल.

**११) पाण्याचा पुनर्वापर करा** (recycling & reuse) **:** आर ओ मधून वाया जाणारे पाणी झाडासाठी किंवा फरशी पुसण्यासाठी वापरा.

तसेच जलशुद्धीकरणात फिल्टर धुतल्यानंतरचे पाणी वाया जाते ते पुन्हा शुध्दीकरणासाठी (recycling) घ्या नाहीतर ते पाणी आपण पुन्हा बागेसाठी किंवा झाडांसाठी किंवा शेतीसाठी वापरले पाहिजे.

Save water.

पाणी वाचवणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ते प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

थेंबे थेंबे तळे साचे या युक्तीप्रमाणे आपण आपल्या छोट्या छोट्या सवयींमधून भविष्यातील मोठे जलसंकट टाळू पाणी हेच जीवन

शकतो.

'पाणी वाचवुया (save water)... जीवन वाचवुयात...

चला तर मग आजच आपल्या घरापासून जलसंवर्धनाची सुरुवात करूयात...!!

- Er. Suresh A. Pardeshi, (Civil Engineer,
Technical service Provider and Contractor.)
Specialist in ESRs, GSRs, U.G. Sumps (Water tanks),
Water treatment plants, Sewage treatment plant
and allied all works... Ahilyanagar.
Phone : 9423783220 / 8999042567
Email id: suresh.pardeshi010@rediffmail.com
Firm : Guruprasad Constructions.

AESA
Architects, Engineers & Surveyors
Association Ahilyanagar

## जाहीर नोटीस (Public Notice)

वादी आनंद मुरलीधर रोकडे यांच्यामार्फत या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे सावेडी तालुका नगर जिल्हा अहिल्यानगर येथील जमीन गट क्रमांक ३८ ही वादग्रस्त जमीन असून सदर जमिनीचा वाद सध्या न्यायप्रविष्ठ आहे. सदर जमिनीबाबत ८ वे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अहमदनगर येथे सन २००२ पासून दिवाणी दावा क्र. रे.मु.नं. ५४/२००२ हा प्रलंबित (Pending) आहे. सदर दाव्यात आनंद मुरलीधर रोकडे वादी (Plaintiff) आहे.

सदर वादग्रस्त जमिनीचा वाटपाचा दावा न्यायालयात अंतिम निर्णय होणे अद्याप बाकी आहे. असे असतानाही, प्रतिवादी (Defendant) सदर जमीन बेकायदेशीरपणे विक्री करण्याचा किंवा तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे.

त्यामुळे या नोटीसीद्वारे जाहीर करण्यात येते की,

१.सदर जमिनीवर न्यायालयीन वाद सुरु असल्याने कोणाही व्यक्तीने सदर जमिनीची खरेदी-विक्री, गहाणखत, भाडेपट्ट किंवा कोणताही व्यवहार करु नये.

२.सदर वादग्रस्त मिळकतीबाबत महानगरपालिकेत बांधकाम परवानगी देण्यास मनाई आहे.

३.जर कोणीही सदर जमिनीबाबत प्रतिवादी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीशी कोणताही व्यवहार केल्यास, तो व्यवहार बेकायदेशीर मानला जाईल.

४.अशा व्यवहारातून उद्भवणाऱ्या कोणत्याही आर्थिक किंवा कायदेशीर नुकसानीस खरेदीदार स्वतः जबाबदार राहील

दिनांक-१७/१०/२०२६, अहिल्यानर

**आनंद मुरलीधर काकडे**
मो. ८८०५२६५५५३

# दिशानची जिद्द आणि मेहनत कौतुकास्पद : पद्मश्री पोपटराव पवार



नगर - अहिल्यानगरचा पुत्र दिशान गांधी याने अनोख्या व नवीन अशा कॉर्फबॉल खेळात राज्याचे नेतृत्व करत महाराष्ट्राला सुवर्णपदकासह विजेतेपद मिळवून दिले. आपल्या कामगिरीने त्याने आता देशाला आंतरराष्ट्रीय पातळीवरही सुवर्ण पदक मिळवून द्यावे. दिशानची जिद्द आणि खेळातील कौशल्य नवोदित खेळाडूंना प्रेरणा देणारे आहे, असे कौतुकोद्गार अ.नगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशनचे अध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांनी दिशान गांधी याचे नगरकरांच्या वतीने अभिनंदन करताना काढले.

भारतात प्रथमच झालेल्या कॉर्फबॉल प्रिमिअम लीग स्पर्धेत दिल्ली धुरंधर संघाला विजेतेपद मिळवून देण्यात महत्वाची भूमिका बजावल्यानंतर दिशानने पंजाब येथे झालेल्या फेडरेशन चषक स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत राज्य संघाला विजेतेपद मिळवून दिले. यानंतर शहरात दाखल झालेल्या दिशानचे अ.नगर कॉर्फबॉल असोसिएशनच्या वतीने फटाक्यांच्या आतषबाजीत व ढोल ताशाच्या गजरात स्वागत करून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी बॉलर्स क्लबचे हर्षल सेलोत व खेळाडूंनी नियोजन केले. बॉलर्स क्लबतर्फे स्टेशन रोडवरील आयकॉन पब्लिक स्कूल व सावेडी येथे बास्केटबॉल व कॉर्फबॉल प्रशिक्षण वर्ग चालवले जातात.

उपाध्यक्ष डॉ.प्रकाश कांकरिया म्हणाले, दिशानची उत्तरोत्तर प्रगती असोसिएशनसाठी अभिमानास्पद आहे. त्याच्या यशात दिशानचे वडील किशोर गांधी व आई बबिता गांधी यांचाही मोठा वाटा आणि प्रोत्साहन आहे. आमच्यासाठी हा खूप आनंदाचा दिवस आहे.

कार्यक्रमास प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, मर्चंटस बँकेचे चेअरमन संजय चोपडा, जिल्हा बँक्स फेडरेशनचे उपाध्यक्ष विष्णू फुलसौंदर, हिंद सेवा मंडळाचे अजित बोरा, आयकॉन पब्लिक स्कूलच्या संचालिका मंजू मुथा, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक संतोष गांधी, डॉ. सुधा कांकरिया, बास्केटबॉलपटू डॉ. प्रशांत सुरकुटला, नाईट स्कूलचे डॉ. पारस कोठारी, संजय गांधी, पवन गांधी व खेळाडू परिवार उपस्थित होता.

दिशानसह महाराष्ट्र राज्य संघातील खेळाडू स्तवन प्रभू, भक्ती परदेशी, पलक राठोड, प्राची काळे यांचाही डॉ. कांकरिया दाम्पत्याच्या वतीने भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा संचालक प्रा. संजय धोपावकर यांनी केले. प्रमोद गांधी (पीटू) यांनी आभार मानले. 'केपीएल' मधील दिशानच्या दिल्ली धुरंधर संघाचे सामने जिओ हॉटस्टारवर पाहता येतील.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **अलिमुन्नीसा फजल सैय्यद, रा. मुल्ला कॉलनी, नवीन मुकुंदनगर, अहमदनगर** यांचे खरेदी मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिला बरोबर झालेला असुन लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे चालु वाद, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ (सात)** दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.

दि. १७/१०/२०२६.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी व तालुका नगर पैकी, अहिल्यानगर (अहमदनगर), महानगरपालिका हद्दीतील, **मौजे भिंगार** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे -

| स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ३४६/२ | ७ | २४६.०० चौ.मी. |

**सदर प्लॉटमध्ये मंजुर प्लॅनप्रमाणे लोडबेअरींगमध्ये बांधकाम झालेल्या सहारा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मधील रो-हौसिंग ब्लॉक नं. ए - ११ याचे प्लॉट क्षेत्र ३९.२१ चौ.मीटर व त्यावरील बांधकाम क्षेत्र २३.०० चौ.मीटर असुन बाकी मागे पुढे खुली जागा असुन अशी बांधकामासह मिळकती बाबत.**

**यांसी चतुःसिमा-**

पुर्वेस - बोळ, दक्षिणेस - ब्लॉक नं. ए १२
पश्चिमेस - ब्लॉक नं. ए ६, उत्तरेस - बोळ

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

**ॲड. तनवीर एम.शेख** नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**ॲड. फरहान आसिफ शेख**
कस्तुरी प्लाझा शेजारी, डावरे गल्ली, अहमदनगर मो.नं.९२७०४६४६००/ ९७६६१४५९३२

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **श्री.राजेश मदनलाल नागपाल, रा.ता. जि.अहमदनगर** यांचे वारसाहक्कान्वये व बक्षीसपत्रान्वये मालकी वहिवाटीची असुन सदर मिळकत विद्यमान मालक यांच्या प्रत्यक्ष ताब्यात व कब्जात आहे. सदर मिळकत विक्री करण्याचा विद्यमान मालक यांना पुर्णपणे कायदेशीर हक्क व अधिकार असुन सदर मिळकत विक्री करणेचा ठरविले आहे. सदर मिळकत विक्रीचा करार आमचे अशिलांबरोबर करुन विसारापोटी रक्कम स्विकारुन आमचे अशिलांच्या लाभात कायमखुष खरेदी देण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकत ही कुठल्याही खाजगी सावकारांकडे गहाण व जडजोखमीत नाही. तसेच सदर मिळकत कुठल्याही कोर्टात न्यायप्रविष्ठ नाही. तसेच सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे विद्यमान मालक यांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणुन या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची चालु वाद, विवाद, मालकी हक्क, ताबा, हितसंबंध, मनाई आदेश, दावा, लिज, गहाण, तारणगहाण, कर्ज, दान, बक्षीस, पोटगी हक्क, इजमेंटचे हक्क, रद्दलेख, साठेखत, खरेदीखत कोणतेही हक्क अधिकार वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५ (पंधरा)** दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे. जर मुदतीत कोणाचीही तक्रार व हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील मग कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत चालणार नाही. असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यात येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा तुकडी अहिल्यानगर (अहमदनगर) पो.तु.ता.नगर पैकी शहरनगर येथील अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील तापीदास गल्ली भागातील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|
| ३३०० | १४२.१० चौ.मी. |

**यापैकी विद्यमान मालक यांचे ताबे कब्जातील पुर्व-पश्चिम लांबीची व दक्षिण-उत्तर रुंदीची जागा ४४.६० चौ.मी. व त्यावरील अर्धेपक्के बांधकाम तळमजला ३७.०० चौ.मी. ब पहिला मजला व गॅलरी ३७.०५ चौ.मी. असे एकुण बांधकाम क्षेत्र ७४. ०५ चौ.मी. ही दुकान मिळकत.**

**यांसी चतुःसिमा-**

पुर्वेस - सि.स.नं.३३०० पैकी जया नंदलाल आहुजा यांचे दुकान
दक्षिणेस - सि.स.नं.३३०१ पश्चिमेस - रस्ता व वाग
उत्तरेस - सि.स.नं.३३०० पैकी किशोर वल्लभदास वर्मा यांची मिळकत

येणेप्रमाणे वर नमुद केलेली मिळकत जागा व त्यावरील अर्धेपक्के बांधकामासहीत त्यामधील लाईट मिटर, व नळ कनेक्शनसह वहिवाटीच्या व इजमेंटच्या हक्कासह काही एक राखुन न ठेविता. वर उल्लेख केलेल्या मिळकतीच्या चतु:सिमा यदाकदाचित नजरचुकीने चुकीच्या असल्यास सरकारी रेकॉर्ड प्रमाणे व कब्जे प्रमाणे असलेल्या चतु:सिमा ग्राहय व अंतीम राहतील.

दि. १७/१०/२०२६

**ॲड. पियुष प्रविण पुरोहित**
धर्माधिकारी मळा, सावेडी, अहिल्यानगर, मो- ९८२२००९२७२




## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **सुनिता राजकुमार गांधी रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी येथील सर्व्हे क्र, ८०/१ब/२/१/२पै/१ब२/१३अ मधील प्लॉट नं.२६ याचे क्षेत्र १४३.७३ चौ. मी. हा संपूर्ण प्लॉट.**

**यांसी चतुःसिमा :-**

पुर्वेस : ९ मी. रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. २७,
पश्चिमेस : सर्व्हे नं.७४, उत्तरेस ९ मी. रस्ता,

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर, दिनांक :- १७/१०/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे विद्यमान मालक **अहमद अली शकिल अहमद सय्यद, रा. मुकूंदनगर, अहिल्यानगर** (अहमदनगर) यांच्या मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांशी केलेला असून, त्याबाबत विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलाकडून विसार म्हणून मोठी रक्कम घेवून विसारपावती दस्त लिहून दिलेला आहे व लवकरच खरेदीखत होणार आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत,असल्याचा विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर प्लॉट मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे चालु वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाईहुकूम, दावा, लिज, गहाण, कर्ज, दान, बक्षिस, पोटगी हक्क,सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ (सात)** दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णनः-** जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिंगार येथील प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ३२१/२ | २० | १८६.०० चौ.मी. |

**यापैकी विद्यमान मालक यांचे मालकीचा प्लॉट चे क्षेत्र ९३.०० चौ.मी. (उत्तर बाजू) व त्यावरील बांधकामासह मिळकतीबाबत.**

यासी चतु:सिमा-

पुर्वेस - प्लॉट नं. २५ पैकी भाग दक्षिणेस - प्लॉट नं. २० पैकी भाग
पश्चिमेस - २० फुट रस्ता उत्तरेस - प्लॉट नं. १९

तारीख- १७/१०/२०२६
अहिल्यानगर (अहमदनगर)

**ॲड. सय्यद अशफाक अहमद**
बी-७, उजाला अपार्टमेंट, सीएन हाईटस, युनियन बँक इंडिया जवळ, गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर-४१४००१, मो. ९८२२०२४०३८, ९०२८२२०६१६

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेल्या प्लॉटस मिळकती या विद्यमान मालक **अतुल सुरजमल चोपडा व आशा अतुल चोपडा दोघे रा.फ्लॅट नंबर २०२, बुरुडगांव रोड, अकोलकर हॉस्पीटल, अहिल्यानगर, सुशिला संतोष ढोकले रा.गणेशनगर, वडगांव शेरी, पुणे, अमोल महादेव गलांडे रा. सिव्हिल हडको, सावेडी, अहिल्यानगर, जयश्री अभिजित तोरडमल रा.मगरपट्टा, मेघा सेंटर, हडपसर, पुणे** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर प्लॉटस मिळकती त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर प्लॉट मिळकती आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. विदयमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम स्विकारली आहे. सदर प्लॉट मिळकती लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे बोल्हेगांव येथील सर्व्हे नं. ७५/३/४३अ/४ब मधील प्लॉट्स मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ (चौ.मी) | विद्यमान मालक | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १३५ | १२८.०० | अतुल सुरजमल चोपडा व आशा अतुल चोपडा | प्लॉट नंबर१२६ | प्लॉट नंबर१३४ | १२.०० मी.रस्ता | प्लॉट नंबर १३६ |
| १३६ | १२८.०० | सुशिला संतोश ढोकले | प्लॉट नंबर१२५ | प्लॉट नंबर१३५ | १२.०० मी.रस्ता | प्लॉट नंबर १३७ |
| १३७ | १२८.०० | अमोल महादेव गलांडे | प्लॉट नंबर१२४ | प्लॉट नंबर१३६ | १२.०० मी.रस्ता | प्लॉट नंबर १३८ |
| १३८ | १२८.०० | जयश्री अभिजित तोरडमल | प्लॉट नंबर१२३ | प्लॉट नंबर१३७ | १२.०० मी.रस्ता | प्लॉट नंबर १३९ |
| एकुण | ५१२.०० चौ. मी. | | | | | |

येणेप्रमाणे चुतःसिमापुर्वक मिळकती दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुद्धा व इतर वागणुकीचे वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकती.

अहिल्यानगर, दिनांक- १७/१०/२०२७

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे , ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.




# अति स्क्रोलिंग देते मानसिक विकाराला निमंत्रण



मनोविकार

स्मार्टफोनचा वाढता वापर आणि स्वस्तात उपलब्ध होणारे 'हाय-स्पीड -इंटरनेट' यामुळे 'सोशल मीडिया'वर स्क्रोल करणे आता अनेकांच्या रोजच्या आयुष्याचा भाग बनले. वेळ मिळाला, की फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप किंवा इतर 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर काहीतरी पाहत राहण्याची सवय अनेकांना लागली आहे; मात्र 'सोशल मीडिया'वर घालवला जाणारा हा वेळ मानसिक आरोग्यावर परिणाम करू शकतो, असा इशारा एका मोठ्या अभ्यासातून देण्यात आला आहे.

'मेंटल हेल्थ रिसर्च' जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनामध्ये 'सोशल मीडिया' वापर आणि नैराश्य म्हणजेच डिप्रेशन यांच्यातील संबंधाचा अभ्यास करण्यात आला. अमेरिकेतील 'युनिव्हर्सिटी ऑफ सिनसिनाटी' आणि 'नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटी'च्या संशोधकांनी हे संशोधन केले आहे. मार्टिन एल. ब्लॉक आणि त्यांच्या टीमने हे संशोधन केले आहे. या संशोधनासाठी २०१४ ते २०२४ या ११ वर्षांच्या कालावधीतील माहितीचा अभ्यास करण्यात आला. संशोधकांनी २८ ते ७० वर्षे वयोगटातील सुमारे एक लाख ८३ हजार अमेरिकन प्रौढांचा समावेश असलेल्या ११ वेगवेगळ्या वार्षिक सर्वेक्षणाचा डेटा तपासला.

महत्त्वाची बाब म्हणजे हा अभ्यास संपूर्ण जगातील लोकांवर झालेला नाही. त्यासाठी अमेरिकेतील नागरिकांचा डेटा वापरण्यात आला. 'सोशल मीडिया'चा वाढता वापर आणि त्याचा मानसिक आरोग्यावर होणारा संभाव्य परिणाम यामुळे या अभ्यासाचे निष्कर्ष जगभरातील 'सोशल मीडिया' यूजर्ससाठी महत्त्वाचे मानले जातात.

या संशोधनातील निष्कर्षानुसार, दररोज 'सोशल मीडिया' वापरण्याचा वेळ साधारण दीडशे मिनिटे म्हणजेच अडीच तासांच्या आसपास पोहोचतो, तेव्हा 'सोशल मीडिया' वापर आणि डिप्रेशनच्या लक्षणांमधील संबंध बदलताना दिसतो. सुरुवातीला हा संबंध जवळपास तटस्थ होता; मात्र 'सोशल मीडिया' वापराचा वेळ सुमारे अडीच तासांपर्यंत पोहोचल्यानंतर त्याचा डिप्रेशनच्या लक्षणांशी सकारात्मक संबंध दिसू लागला. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, सोशल मीडियावर दररोज घालवलेल्या वेळेत प्रत्येक अतिरिक्त एक तासाची वाढ झाली, तर डिप्रेशनची लक्षणांची शक्यता सुमारे १७ टक्क्यांनी वाढल्याचे दिसले. याचा अर्थ असा नाही, की 'सोशल मीडिया' वापरामुळेच डिप्रेशन होते; मात्र 'सोशल मीडिया' वापरण्याचा जास्त वेळ आणि डिप्रेशनची लक्षणे यांच्यात संबंध आढळल्याचे या संशोधनातून दिसून आले.

# 'बी१२' आणि 'डी' जीवनसत्त्वांच्या कमतरतेची चिंता




आरोग्यभान

भारतातील पोषणाशी संबंधित आव्हाने आता केवळ कुपोषणापुरती मर्यादित राहिलेली नाहीत. बदलती जीवनशैली, असंतुलित आहार आणि शरीराला आवश्यक सूक्ष्म पोषकद्रव्ये पुरेशा प्रमाणात न मिळणे यामुळे विविध जीवनसत्त्वे आणि खनिजांची कमतरता ही आरोग्याची मोठी समस्या बनत आहे. त्यात व्हिटॅमिन बी १२ आणि व्हिटॅमिन डीची कमतरता विशेष चिंतेचा विषय ठरत आहे. विविध संशोधनांमध्ये भारतीय लोकसंख्येतील वेगवेगळ्या गटांमध्ये या दोन्ही जीवनसत्त्वांची कमतरता मोठ्या प्रमाणात आढळून आली आहे.

'नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशन'च्या (एनसीबीआय) संशोधनानुसार, भारतीयांमध्ये व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता ही मोठी आरोग्य समस्या आहे. या अहवालानुसार, भारतातील सुमारे ४७ ते ७५ टक्के लोकसंख्येला बी १२ च्या कमतरतेचा धोका असल्याचे आढळले आहे. त्याचप्रमाणे व्हिटॅमिन डीच्या कमतरतेची प्रकरणेही मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. शरीरात लाल रक्तपेशी तयार करणे, डीएनएची निर्मिती आणि मज्जासंस्थेचे कार्य सुरळीत ठेवण्यासाठी व्हिटॅमिन बी १२ महत्त्वाची भूमिका बजावते. भारतीय आहारामध्ये बी १२ चे नैसर्गिक स्रोत तुलनेने मर्यादित असल्याने त्याची कमतरता निर्माण होऊ शकते. विशेषतः पूर्णपणे शाकाहार घेणाऱ्या व्यक्तींमध्ये बी १२ च्या कमतरतेचा धोका वाढू शकतो.

बी १२ ची कमतरता झाल्यास सतत थकवा जाणवणे, अशक्तपणा, चक्कर येणे, हात-पायांना मुंग्या येणे, स्मरणशक्ती आणि एकाग्रतेशी संबंधित समस्या निर्माण होऊ शकतात. दीर्घकाळ ही कमतरता राहिल्यास रक्तक्षय (ॲनिमिया) तसेच मज्जातंतूंना इजा होण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

शरीरात कॅल्शियमचे शोषण, हाडांचे आरोग्य आणि स्नायूंची कार्यक्षमता यासाठी व्हिटॅमिन डी अत्यंत आवश्यक आहे. भारतात वर्षभर पुरेसा सूर्यप्रकाश उपलब्ध असूनही मोठ्या संख्येने लोकांमध्ये व्हिटॅमिन डीची पातळी कमी आढळते. घरात किंवा कार्यालयात अधिक वेळ घालवणे, सूर्यप्रकाशात कमी जाणे, शरीर पूर्णपणे झाकून ठेवणे तसेच आहारातून व्हिटॅमिन डीचे पुरेसे स्रोत न मिळणे ही त्यामागील संभाव्य कारणे असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. एका भारतीय मेटा-विश्लेषणानुसार, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेचे प्रमाण सुमारे ६१ टक्के, तर व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेचे प्रमाण सुमारे ५३ टक्के आढळले आहे; मात्र वेगवेगळ्या संशोधनांमध्ये कमतरतेचे प्रमाण वेगवेगळे असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

केवळ थकवा किंवा अशक्तपणा जाणवत असल्याने शरीरात जीवनसत्त्वांची कमतरता आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. आवश्यकता भासल्यास रक्ताची तपासणी करून डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. आहारामध्ये दूध, दही, अंडी, मासे तसेच इतर पौष्टिक पदार्थांचा समावेश करणे फायदेशीर ठरू शकते; मात्र आहारातील बदल व्यक्तीच्या गरजेनुसार करणे आवश्यक आहे. व्हिटॅमिन डीसाठी सुरक्षित पद्धतीने सूर्यप्रकाश घेणे आणि गरज असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने पूरक औषधे (सप्लिमेंट्स) घेणे योग्य ठरते.

# हाता-बोटात सुन्नपणा?

डॉ. योगेश पोटे



हस्तांदोलन करताना हातात पुरेशी ताकद जाणवत नाही? बोटांमध्ये सतत सुन्नपणा जाणवतोय? हातातील वस्तू गळून पडतात? ही केवळ थकवा आल्याचे किंवा वय वाढल्याचे लक्षणे नाहीत, तर हे पाठीच्या कण्यामधील मज्जारज्जूवर (स्पायनल कॉर्ड) विविध कारणांमुळे येणाऱ्या दाबाचे (स्पायनल कॉर्ड कॉम्प्रेशन/मायलोपथी) सुरुवातीचे लक्षण असू शकते. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास अडखळत चालणे, अंग सुन्न होणे अशा पुढील टप्प्यातील आजारांनादेखील निमंत्रण मिळू शकते.

'स्पायनल कॉर्ड कॉम्प्रेशन' म्हणजे मणक्याच्या आतून जाणाऱ्या मज्जारज्जूवर हाडे, चकती, गाठ किंवा इजा यामुळे येणारा दाब. हा दाब वाढला, की मज्जासंस्थेवर परिणाम होऊन हात-पाय अशक्त होणे, हालचाली मंदावणे आणि समन्वय कमी होणे अशी लक्षणे दिसू लागतात. तरुणपणी ही लक्षणे न जाणवता वय वाढताना जाणवतात. त्यामुळे रुग्णाला हा वाढत्या वयाचा परिणाम असल्याचा गैरसमज होतो व त्याकडे दुर्लक्ष होते; परंतु सुरुवातीच्या टप्प्यात याचे निदान झाल्यास ही स्थिती औषधोपचार, फिजिओथेरपी किंवा शस्त्रक्रियेद्वारे दूर करता येते.

**लक्षणे कोणती ?**

* हस्तांदोलन करताना हातात ताकद न वाटणे
* बोटं, तळहात सुन्न होणं किंवा मुंग्या येणे
* वारंवार वस्तू हातातून गळून पडणे
* चालण्यात किंवा पाय हलवताना अडचण

संतुलन बिघडणे किंवा अंग जड होणे

**काय कराल?**

हातांमध्ये अचानक अशक्तपणा येणे किंवा सतत सुन्नपणा जाणवणे, याकडे दुर्लक्षित करू नका. अशा वेळी 'एमआरआय'सारख्या तपासण्या करून मूळ कारण शोधणे आणि त्यावर त्वरित उपचार करणे अत्यावश्यक आहे. वेळीच योग्य उपचार केल्यास मज्जारज्जूवरील दाब कमी करता येतो आणि पुढील गुंतागुंत टाळता येते.

# कर्करोगावर लस विकसित




संशोधन

कर्करोगावर उपचाराचा अवाढव्य खर्च आणि यातना सहन करणाऱ्यांना दिलासा देणारी बातमी आली आहे. अमेरिकेची कंपनी 'मॉडर्ना' आणि औषध कंपनी 'मर्क'ने 'एमआरएनए' आधारित 'पर्सनलाईज्ड कॅन्सर थेरपी व्हॅक्सीन' तयार केले आहे. मेलानोमा म्हणजे त्वचेचा कर्करोग असलेल्या रुग्णांवर केलेल्या मोठ्या व्यापक परीक्षणात या लसीला मोठे यश मिळाले आहे. ही लस प्रत्येक रुग्णाला एक सारखी नसणार तर प्रत्येक रुग्णाच्या ट्युमरच्या तपासणी आधारे केली जाणार आहे.

आधी डॉक्टर रुग्णाच्या कर्करोगामध्ये कोणकोणते खास जेनेटिक चेंजेस आहेत, हे पाहतील. त्यानंतर त्या बदलाच्या आधारे लस तयार केली जाणार आहे. याचा हेतू शरीराच्या रोग प्रतिकारक क्षमतेला कर्करोग ओळखणे आणि त्याच्या विरोधात हल्ला करण्यासाठी तयार करणे हा आहे. कंपनीच्या मते मोठ्या फेज ट्रायलमध्ये या लशीला मर्कच्या इम्युनोथेरपीचे औषध ट्रुडा सोबत दिल्यानंतर कर्करोग पुन्हा दुसऱ्यांदा होणे आणि शरीराच्या अन्य भागात पसरण्यापासून सुटका होते. कर्करोगावरील इलाजाच्या पद्धतीतील बदलाची शक्यता दाखवत आहे. आता कर्करोगाचा उपचार कर्करोगाचे प्रकार आणि रुग्णाची स्थितीच्या आधारे केला जातो; परंतु मॉडर्नाची पद्धत रुग्णाच्या ट्युमरच्या खास ओळख ध्यानात घेतो. 'इंटरपॅथ -००१' च्या तिसऱ्या टप्प्याच्या चाचणीत ११३७ रुग्ण समाविष्ट होते. त्यांचा गंभीर 'मेलानोमा ऑपरेशन'ने काढला गेला आहे.

# तिशीपूर्वीच गंभीर आजार?







आरोग्य चर्चा

साधारणपणे तिशीचा काळ हा तुलनेने निरोगी आणि सक्रिय आयुष्याचा टप्पा मानला जातो; मात्र सध्याच्या काळात मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, फॅटी लिव्हर (यकृतामध्ये चरबी साचणे), तसेच हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित विविध जोखीम घटकांचे निदान पूर्वीपेक्षा कमी वयात होताना दिसत आहे. याचा अर्थ असा नाही, की या समस्यांसाठी केवळ वय कारणीभूत आहे. अनुवांशिक प्रवृत्ती, बदलती जीवनशैली, चयापचयाशी संबंधित जोखीम घटक आणि आजारांचे लवकर होणारे निदान या सर्वांचा त्यामध्ये महत्त्वाचा वाटा असतो.

सध्याच्या जीवनशैलीतील सर्वात ठळक बदल म्हणजे शारीरिक हालचालींचे प्रमाण कमी होणे. दिवसभर डेस्कवर बसून काम करणे, कामाच्या ठिकाणी जाण्या-येण्यासाठी अनेक तास प्रवास करणे आणि संगणकासमोर दीर्घकाळ बसणे यामुळे शारीरिक निष्क्रियता वाढत आहे. याचा परिणाम वजन वाढणे आणि चयापचयाशी संबंधित विकारांचा धोका वाढण्यात होऊ शकतो. शारीरिक निष्क्रिय जीवनशैली हा असंसर्गजन्य आजारांचा एक महत्त्वाचा जोखीम घटक मानला जातो. आहाराच्या सवयींमध्येही मोठे बदल झाले आहेत. रिफाइंड अन्नपदार्थ, साखरयुक्त पेये आणि जास्त कॅलरी असलेल्या पदार्थांचे सेवन वाढल्याने शरीराचे योग्य वजन आणि चयापचयाचे संतुलन राखणे अधिक कठीण होत आहे. यासोबतच धूम्रपान आणि अतिमद्यपान हे हृदय व चयापचयाशी संबंधित आजारांचा धोका वाढवणारे इतर महत्त्वाचे घटक आहेत.

भारतीय लोकसंख्येच्या संदर्भात काही विशिष्ट बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. अनुवांशिक संवेदनशीलता, त्यासोबत वाढलेली निष्क्रिय जीवनशैली आणि बदललेल्या आहाराच्या सवयी यामुळे तुलनेने कमी प्रमाणात शरीरातील चरबी असतानाही मेटाबॉलिक सिंड्रोम विकसित होण्याची शक्यता असू शकते.

# वारंवार तोंड येतेय?



आरोग्य चर्चा

तोंडात फोड येणे, सूज येणे किंवा अल्सर होणे, यालाच सर्वसामान्य भाषेत 'तोंड येणे' असे म्हटले जाते. अनेकजण ही किरकोळ समस्या समजून त्याकडे दुर्लक्ष करतात; मात्र ठरावीक कालावधीत तोंडातील फोड किंवा अल्सर बरे होत नसतील, तर ते शरीरातील गंभीर आजाराचे संकेत असू शकतात. वेळेवर निदान करून योग्य उपचार घेतल्यास या समस्येवर प्रभावीपणे नियंत्रण मिळवता येते.

आरोग्यतज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, तोंडाची आतील त्वचा (म्युकस मेंब्रेन) अतिशय नाजूक आणि संवेदनशील असते. या भागावर लाल किंवा पांढरे चट्टे, लहान जखमा (अल्सर), सूज किंवा फोड निर्माण होऊ शकतात. सर्वसाधारणपणे तोंड येणे ही किरकोळ समस्या मानली जाते; मात्र काही वेळा ते शरीरातील गंभीर आजारांचे किंवा पोषणातील कमतरतेचेही लक्षण असू शकते. तोंड आल्यावर जीभ कोरडी पडणे, जिभेवर काटे येणे, अल्सर होणे तसेच खाणे-पिणे आणि बोलताना वेदना होणे अशा तक्रारी जाणवू शकतात.

तोंड येण्यामागे अनेक कारणे असू शकतात. शरीरातील जीवनसत्त्वे, विशेषतः बी-समूहातील जीवनसत्त्वे, लोह किंवा फॉलिक ॲसिडची कमतरता हे एक महत्त्वाचे कारण आहे. याशिवाय, ॲसिडिटी, चयापचयातील बिघाड, काही गंभीर आजार, गुटखा व तंबाखूचे सेवन, रात्रीची अपुरी झोप, मानसिक ताण, जेवणाच्या वेळांमध्ये सातत्याने होणारे बदल, सतत बाहेरचे किंवा तेलकट-तिखट पदार्थ खाण्याची सवय यामुळेही तोंड येण्याचा त्रास होऊ शकतो.

तोंड आल्यावर तोंडातील लाळ नैसर्गिकरीत्या जखम भरून येण्यास मदत करते. त्यामुळे बहुतांश वेळा अल्सर पाच ते सहा दिवसांत आपोआप बरे होतात; मात्र जखम एक आठवड्यापेक्षा अधिक काळ टिकून राहिल्यास, वारंवार तोंड येत असल्यास किंवा वेदना वाढत असल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. कारण अशा वेळी जीवनसत्त्वांच्या कमतरतेवर औषधे, प्रतिजैविके किंवा इतर आवश्यक उपचारांची गरज भासू शकते. काही दुर्मीळ प्रकरणांमध्ये तोंडातील न भरून येणाऱ्या जखमा कर्करोगाचेही लक्षण असू शकतात. त्यामुळे वेळेत तपासणी करून योग्य उपचार सुरू करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

डोळ्यांचं आरोग्य

## लक्षणं मोतीबदूची



मोतीबदू हा सर्रास आढळणारा नेत्रविकार आहे. मोतीबदूची काही लक्षणं पहायला मिळतात. सकाळी उठून खिडकीबाहेर बघितल्यावर धुरकट दिसत असेल तर तुम्हाला मोतीबदू आहे, असं समजायला हरकत नाही. मोतीबदू झाल्यानंतर तुम्हाला अंधुक, धुरकट दिसू लागतं. यामुळे वाचताना, गाडी चालवताना, चेहऱ्यावरचे भाव वाचताना अडचणी निर्माण होतात. त्यातही रात्रीच्या वेळी हा त्रास अधिक वाढतो. त्यामुळे अंधुक दिसत असेल तर तातडीने डोळ्यांची तपासणी करून घ्या.

जपणूक त्वचेची

## रात्री धुवा चेहरा



त्वचेची नियमित काळजी घेतल्यामुळे त्वचाविकारांना आळा घालता येतो. दररोज रात्री झोपण्याआधी चेहरा स्वच्छ धुणं गरजेचं आहे. दिवसभराच्या धामधुमीत चेहऱ्यावर बरीच धूळ, घाण बसते. प्रदूषित कणांमुळे त्वचेची बरीच हानी होते. म्हणूनच ही सगळी अस्वच्छता दूर करण्यासाठी दररोज रात्री झोपण्याआधी चेहरा धुवायला हवा. धूळ, प्रदूषित कणांमुळे त्वचेची रोमछिद्रं बंद होतात. रात्री चेहरा धुतल्यानंतर ही रोमछिद्रं खुली होऊन त्वचा मोकळा श्वास घेऊ शकते. बंद झालेली रोमछिद्रं, चेहऱ्यावर साठलेली घाण यामुळे पपल्स होतात. हा त्रास कमी करण्यासाठी रात्री चेहरा धुवायला हवा.

आजीबाईचा बटवा

## लाभ मूगडाळीचे



डाळींचं महत्त्व आपण जाणतोच. त्यातही मूगडाळ खूप लाभदायी आहे. मूगडाळीच्या सेवनाने बरेच आजार दूर होतात. वजन कमी करण्यापासून उच्च रक्तदाब नियंत्रित ठेवण्यापर्यंत बऱ्याच बाबी मूगडाळीच्या सेवनाने साध्य होऊ शकतात. मूगडाळ हलकी असल्यामुळे पटकन पचते. यामुळे पोटाशी संबंधित तक्रारी दूर होतात. मूगडाळीत पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फायबरसारखे पोषक घटक असतात. पोटॅशियममुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहू शकतो. यातल्या विरघळणाऱ्या फायबरमुळे पोटाच्या तक्रारी दूर होऊ शकतात. मूगडाळीमुळे चयापचय क्रिया सुधारते तसंच रोगप्रतिकारकशक्तीही वाढते. त्यामुळे मूगडाळीचं सेवन नियमितपणे करायला हवं.



समान काम, समान वेतन या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले. (छायाचित्र – लहू दळवी)

# जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांचे २ दिवस काळ्या फिती लावून कामकाज

## समान काम, समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचारी संपाच्या पवित्र्यात

नगर – समान काम, समान वेतन या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी १६ व १७ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून शांततेच्या मार्गाने कामकाज केले. वेतनश्रेणी सुधारणा समितीने मंजूर केलेला प्रस्ताव शासनाने अद्याप मान्य न केल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. शासनाने ५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मागणी मान्य न केल्यास राज्यातील न्यायालयीन कर्मचारी त्या दिवशी सामूहिक रजेवर जातील. त्यानंतरही मागणी मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारण्यात येईल, अशी माहिती अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे यांनी दिली.

या आंदोलनात अहमदनगर जिल्हा न्यायालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, सचिव रविंद्र सूर्यपुजारी, कार्याध्यक्ष एस. डी. ढाळे, उपाध्यक्ष अतुल खरपुडे, अस्लम सयद, आजिनाथ पाडळकर, म्हाळसाकांत लिपाणे, अनिल निमसे, संतोष लईचट्टी यांच्यासह इतर पदाधिकारी तसेच अधीक्षक सविता भालेराव, संगिता कोल्हे, जया गुप्ता, स्वाती क्षिरसागर, देवेंद्र शिंदे, केशव गपाट, अरुण शिंदे, दत्तात्रय काकडे, बद्रीनाथ गुंजाळ, बाळासाहेब शिंदे, रविंद्र घोडके, अरुण आल्हाट, श्रीपाद माचवे, युवराज गुंजाळ, तुषार बुर्ला, दीपक दसुंगे उद्धव नरवडे आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही समान काम, समान वेतनाच्या धर्तीवर वेतनश्रेणी सुधारणा लागू करण्यात यावी, अशी मागणी आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांच्या माध्यमातून वेतनश्रेणी सुधारणा समितीने मंजूर केलेला प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ रोजी अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र, २० महिने उलटूनही शासनाकडून त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे संघटनेने म्हटले आहे. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात १६ सप्टेंबर २०२६ रोजी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी एक दिवस काळ्या फिती लावून कामकाज केले. दुसऱ्या टप्प्यात १६ व १७ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शांततेच्या मार्गाने कामकाज केले, असल्याचे संघटनेचे कार्याध्यक्ष एस. डी. ढाळे यांनी सांगितले.

### ५ नोव्हेंबरला सामूहिक रजा

शासनाने या आंदोलनाची दखल न घेतल्यास तिसऱ्या टप्प्यात ५ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी एक दिवसाची सामूहिक रजा घेऊन आंदोलन तीव्र करतील. त्यानंतरही महाराष्ट्रातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांची समान काम, समान वेतनाची मागणी मान्य न झाल्यास नाइलाजास्तव १७ नोव्हेंबरपासून राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांसोबत बेमुदत संपावर जावे लागेल. त्यामुळे न्यायालयीन कामकाजावर जे परिणाम होतील, त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची असेल, असा इशारा ढाळे यांनी दिला.

### १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा

या आंदोलनात कार्यरत न्यायालयीन कर्मचाऱ्यांसोबत सेवानिवृत्त कर्मचारीदेखील सहभागी झाले आहेत. सेवानिवृत्त कर्मचारी १७ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून समान काम, समान वेतनाच्या मागणीसंदर्भात निवेदन देणार असून, त्यांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला असल्याचेही ढाळे यांनी सांगितले. शासनाने ५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वेतनश्रेणी सुधारणा समितीचा मंजूर प्रस्ताव मान्य न केल्यास महाराष्ट्रातील सर्व न्यायालयीन कर्मचारी एक दिवस सामूहिक रजेवर जाणार आहेत. त्यानंतरही मागणी मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप सुरू करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.



## गुरुवाणी – ८३
## संयमाचा राजमार्ग

जीवनात वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या असतात आणि त्याचे समाधानही वेगवेगळे असतात. काही समस्यांचे समाधान कृती केली की होते तर काही समस्यांचे समाधान शांत राहिल्याने मिळते. काही समस्यांचे समाधान शोधण्यासाठी वेट अँड वॉच भूमिका लागते. काही समस्यांचे समाधान सोडून दिल्याने होते. प्रत्येक ठिकाणी डोकेफोड केलीच पाहिजे असे नाही. काही वेळेस कृती करणेही आवश्यक असते. अनेक गोष्टी आपण करू शकतो पण करत नाही. कारण करवून घेणारा नसतो. कोंढाणा किल्ला घेण्यासाठी तानाजी मालुसरे, शेलार मामा रात्रीच्या काळोखात हल्ला करतात. पण शत्रू जागा होतो आणि मावळे पलायन करू लागतात. त्यावेळी शेलार मामा काही न बोलता परतीचे दोर कापून टाकले. जीवनात काही वेळा असे शेलार मामा पाहिजे. जे परतीचे दोरच कापून टाकतात. माणसाचे मूल करवून नाही घेतले तर काहीच करत नाही. त्याला चालायला, बोलायला सगळंच शिकवावं लागतं. अर्जुनाला सुद्धा श्रीकृष्णाची गरज पडली, अन्यथा तो सुद्धा रणभूमी सोडून चाललाच होता. तीर्थंकर परमात्म्याचे समवशरण ते करत नाही, ते आपोआप होते. तिथे साप व मुंगुसात मैत्री भाव निर्माण केला जात नाही, आपोआप निर्माण होतो. असे असले तरी सगळ्या गोष्टींचे समाधान शांत बसून होत नाही. 'हर जगह सीर झुकाने से, विनय से काम नहीं होता' परमात्म्याने जीवनातील विविध समस्यांच्या समाधानासाठी वेगवेगळे मार्ग सांगितले आहेत. त्यांना पूर्ण माहिती होते कुठे कृती करायची, कुठे नाही करायची. एक कथा आहे, श्रावक शाकाहारी व्रतधारी असतो पण त्याची पत्नी मांसाहारी असते. दारू पिऊन ती पौषध करणाऱ्या पतीला वाईट बोलते. पती तिला म्हणतो, 'तू कशाला जास्त बोलतेस, तू नरकातच जाणार आहे'. हे ऐकताच तिची नशाच उतरते. भगवान महावीर इंद्रभूती गौतमला त्या श्रावकाकडे पाठवतात. त्या श्रावकाने पौषध व्रताचा भंग केला आहे., त्याला सांग आलोचना कर. ही होती तीर्थंकरांची क्रिया. ज्याला तुमच्या विनयशीलतेचे मूल्य नसते त्यांच्यासमोर झुकायचे नसते. तिथे हात जोडायचे नसतात. काही ठिकाणी सगळं माहिती असूनही अज्ञानी राहिले पाहिजे. उगीच डोके चालवायचे नाही. या गोष्टी कळल्या तर संयमाचा मार्ग सुकर होईल. सर्व काही भाग्यावर सोडूनही चालत नाही. पुरूषार्थ करावाच लागतो. युद्धात जिंकणे हरणे महत्वाचे नाही. लढाई प्रयत्न पूर्वक केली की नाही हे महत्त्वाचे असते.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या समान वेतनाच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

नगर – महाराष्ट्र राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान कामासाठी समान वेतन लागू करावे, वेतनश्रेणीतील तफावत दूर करावी आणि प्रलंबित मागण्यांची पूर्तता करावी, या मागणीसाठी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १७ ऑक्टोबर रोजी आंदोलन केले.

न्यायालयीन कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. तसेच वेतनश्रेणीतील तफावत दूर करून सुधारित वेतनाचा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दिवाळीपूर्वी मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी विनंती करण्यात आली असून या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास न्यायालयीन कर्मचारी आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम राहणार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या समान वेतनाच्या मागणीसाठी आंदोलनप्रसंगी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अविनाश नगरकर, हेमंत जोशी, शंकर गावडे, शिवाजी संदुपटला, विजय पोंदे, लांबदाडे, मधुकर वामन, तरडे, अवसरे, लोखंडे, राठोड यासह महिला प्रतिनिधी श्रीमती शारदा जाधव, रागिनी माळवदे, स्नेहा राव आदी उपस्थित होते. (छायाचित्र : उदय जोशी)

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जिल्हा न्यायालयातील शंभर ते दीडशे निवृत्त न्यायालय कर्मचारी यावेळी उपस्थित होते. आंदोलनाचे वेळी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस अविनाश नगरकर यांनी समान काम समान वेतन याबाबत सविस्तर माहिती व मागणी केली. तसेच श्री. पिरजादे यांनी यांनीही मनोगत व्यक्त करून सदर मागण्या लवकरात लवकर मान्य करावे ही अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अविनाश नगरकर, हेमंत जोशी, शंकर गावडे, शिवाजी संदुपटला, विजय पोंदे, लांबदाडे, मधुकर वामन, तरडे, अवसरे, लोखंडे, श्री राठोड यासह महिला प्रतिनिधी श्रीमती शारदा जाधव, रागिनी माळवदे, स्नेहा राव आदी उपस्थित होते.

# जिल्हा बँक निवडणूक : माघारीसाठी नेत्यांची होणार कसरत

## भाजपाने डावलल्याने शिवसेना नाराज

नगर – जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत २१ ऑक्टोबर असून आतापर्यंत केवळ १५ जणांनीच माघार घेतलेली आहे. त्यामुळे ज्यांनी अर्ज दाखल केलेले आहेत, त्यांची मनधरणी करताना नेतेमंडळींची चांगलीच कसरत होणार आहे. पक्षीय मतभेद बाजुला ठेवून विखे व थोरात गट या जिल्हा बँकेत एकत्र आले असून त्यांना खासदार नीलेश लंके हे आव्हान देण्याच्या तयारीत आहेत. या निवडणुकीत भाजपाने मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेच्या शिंदे गटाला डावल्याने त्यांच्यात नाराजी असून हा गट लंके यांच्याशी हातमिळवणी करण्याच्या तयारीत आहे.

आमदार विवेक कोल्हे, माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी आमदार चंद्रशेखर घुले, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई रणजितसिंग देशमुख हे चार संचालक बिनविरोध निवडून आले असून उर्वरित १७ जागांसाठी २२४ उमेदवार रिंगणात आहेत. विखे व थोरात गट एकत्र आल्याने ही निवडणूक बिनविरोध करण्याच्या हलचालींनी वेग धरला होता. या गटाच्याच चार जागा बिनविरोध झाल्या असून आणखीही काही जागा बिनविरोध होण्याच्या मार्गावर आहे. परंतु इच्छुकांनी मोठ्या प्रमाणात भरलेले अर्ज व खासदार लंके यांनी प्रस्थापितांविरोधात नारा देत विस्थापितांची मोट बांधण्याच्या हलचालींना वेग दिल्याने ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमीच आहे. लंके यांच्यासह विरोधकांनी ज्येष्ठ नेते शरद पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मागील आठवड्यात भेट घेतली परंतु या दोघा नेत्यांनी या निवडणुकीबाबत अद्याप कोणत्याही सुचना दिल्या नसल्याचे समजते.



### सुजय विखे यांच्या अर्जावर १९ ऑक्टोबरला सुनावणी

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ.सुजय विखे यांच्या जिल्हा बँकेच्या उमेदवारीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात तीन तास सुनावणी झाली असून याबाबतचा निर्णय राखीव ठेवण्यात आला आहे. १९ ऑक्टोबरला अंतिम आदेश होण्याची शक्यता असून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या निर्णयाकडे लागले आहे. डॉ. विखे यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी राहाता तालुका विविध कार्यकारी सेवा सहकारी मतदारसंघातून दाखल केलेला अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी वैध ठरविला होता. परंतु, या निर्णयाविरोधात लोणी येथील चंद्रभान घोगरे यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. डॉ. विखे हे राहुरी येथील डॉ. बाबुराव बापुजी तनपुरे या सहकारी साखर कारखान्याचे संचालक असताना त्यांनी कारखान्याचे थकीत कर्ज परतफेडीची हमी घेतली होती. त्यामुळे ते ज्या बँकेचे थकबाकीदार आहेत त्या बँकेची कर्जफेड केल्याशिवाय त्यांना उमेदवारी करता येणार नाही, असा आक्षेप घोगरे यांनी घेतला आहे, तर, विखे यांच्या बाजूने ते कारखान्याचे संचालक नसून तज्ज्ञ संचालक आहेत. त्यामुळे त्यांना कर्जाला जबाबदार धरता येणार नाही. संचालक म्हणून त्यांच्याकडे थकबाकी असती तर त्यांना जिल्हा बँकेने नोटीस काढली असती असा युक्तीवाद करण्यात आलेला आहे.






# खासगी बस प्रवासात व्यावसायिकाची सोन्याची चेन लांबवली; गुन्हा दाखल

नगर – मुंबईहून अहिल्यानगरकडे खाजगी बसने प्रवास करणाऱ्या एका व्यावसायिकाच्या गळ्यातील सुमारे ८५ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन चोरट्याने लांबवल्याची घटना घडली.. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशोक नरसि उगरेजा (वय ५१, रा. कुष्ठधाम रोड, बारस्कर मळा, सावेडी, अहिल्यानगर) असे फिर्यादी असलेल्या मसाला विक्रेत्याचे नाव आहे. अशोक उगरेजा हे त्यांच्या कामानिमित्त मुंबई येथे गेले होते. काम संपवून ते १५ ऑक्टोबर रोजी रात्री दादर (मुंबई) येथून हमसफर ट्रॅव्हलसच्या बसने अहिल्यानगरकडे परतण्यासाठी निघाले होते. प्रवासादरम्यान त्यांच्या गळ्यात २०.३६० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन होती. रात्रीच्या प्रवासात त्यांना गाढ झोप लागली होती.

दरम्यान, १६ ऑक्टोबर रोजी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास बस अहिल्यानगर शहरातील स्वस्तिक चौक, पुणे बस स्थानकासमोर आली असता, उगरेजा खाली उतरले. त्यावेळी त्यांना गळ्यातील सोन्याची चेन जागीच नसल्याचे लक्षात आले. त्यांनी तातडीने बसमधील संबंधित जागेची आणि आजूबाजूला कसून पाहणी केली, मात्र ती कुठेही आढळून आली नाही. अज्ञात चोरट्याने प्रवासादरम्यान संधी साधून ही चेन चोरल्याची त्यांची खात्री पटली.

या प्रकरणी अशोक उगरेजा यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवला आहे. तपास पोलीस करीत आहेत.

# नगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश

## खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला आनंद

नगर – अहिल्यानगर येथे नव्याने मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचे प्रवेश पूर्ण होऊन महाविद्यालय प्रत्यक्ष सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी महाविद्यालयाला भेट देऊन विद्यार्थी, अधिष्ठाता, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू व्हावे, ही अनेक वर्षांपासूनची इच्छा पूर्ण झाल्याने मनस्वी आनंद होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान जिल्ह्यातील नागरिकांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची मागणी केली होती. त्यावेळी खासदार झाल्यानंतर जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय आणण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार खासदार झाल्यानंतर या महाविद्यालयासाठी पाठपुरावा केला. खासदार सुप्रिया सुळे यांनीही यासाठी सहकार्य केले. त्यातून महाविद्यालयाला मंजुरी मिळाली असून, आता पहिल्या तुकडीतील १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्याचे पाहून समाधान वाटत असल्याचे खासदार लंके यांनी सांगितले.

कोटा येथील एक विद्यार्थी अहिल्यानगरमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी दाखल झाल्याचे समजल्यावर त्यांनी आनंद व्यक्त केला. आपल्या भागातील विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी बाहेर जात असताना अन्य भागांतील विद्यार्थी अहिल्यानगरमध्ये शिक्षणासाठी येणे ही अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले.

यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अविनाश लांब, डॉ.श्रीकांत रोकडे, डॉ. दीपक बनसोडे, डॉ.गणेश घुगे, डॉ. राजेंद्र अंकुशे, डॉ. गणेश नितुरकर डॉ. विष्णू कनकुटे यांच्यासह महाविद्यालयातील इतर अध्यापक वर्ग व महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार कोकरे व इतर सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.












# पिंपळगाव उज्जैनीत उज्जैनी माता मंदिरात नवरात्र उत्सव

नगर – नगर तालुक्यातील पिंपळगाव उज्जैनी येथील श्री उज्जैनी माता मंदिरात नवरात्र उत्सव उत्साहात साजरा केला जात आहे. नवरात्रोत्सवानिमित्त मंदिरात दर्शनासाठी दररोज भाविकांची गर्दी होत आहे.



उज्जैनी माता हे मध्य प्रदेशातील उज्जैन येथील श्री हरसिद्धी मातेचे ठाणे असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. या श्रद्धास्थानाला परिसरातील भाविकांमध्ये विशेष महत्त्व असून, नवरात्रोत्सवाच्या काळात देवीच्या दर्शनासाठी भाविक येत आहेत.

